# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २९२ ◆ मंगळवार, १० मे २०२२ ◆ रायगड ◆ पाने ८ ◆ किंमत २ रुपये | ◆ Year : 14 ◆ Issue : 292 ◆ Tuesday, 10 May 2022 ◆ Raigad ◆ Page - 8 ◆ Price - 2





(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ३ वर..

# रयत शिक्षण संस्थेच्या विकासात भरीव योगदानाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबीयांचा हृद्य सत्कार

सातारा : हरेश साठे

**ज्ञानाच्या आधाराशिवाय प्रगती होत नाही. म्हणून ती संधी प्रत्येकाला मिळाली पाहिजे हे उद्दिष्ट पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे राहिले. त्यामुळेच रयत शिक्षण संस्था देशातील एक नंबरची संस्था झाली असून लोकनेते रामशेठ ठाकूर या संस्थेच्या कार्याला मदतीचा हात खुला करून देत असतात, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी सोमवारी (दि. ९) येथे केले.**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा ६३वा पुण्यतिथी कार्यक्रम खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून दानशूर व्यक्तींचा सन्मान, गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर संस्थेतील उत्कृष्ट शाखांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विठ्ठल शिवणकर, साताऱ्याचे पालकमंत्री बाळासाहेब पाटील, कृषी राज्यमंत्री विश्वजित कदम, खासदार श्रीनिवास पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार आशुतोष काळे, आमदार शशिकांत शिंदे, संस्थेचे सहसचिव संजय नागपुरे, ऑडिटर शिवलिंग मेनकुदळे तसेच जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, पी. जे. पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत यांच्यासह पदाधिकारी आणि रयतसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेला जेव्हा जेव्हा मदतीची गरज असते तेव्हा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमी हाकेला साद देऊन संस्थेच्या विकासासाठी सातत्याने भरीव योगदान देत असतात. कर्तृत्व, दातृत्वाबरोबरच राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व देत सामाजिक जाणीव व बांधिलकी जोपासणारे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबीयांचा रयत शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते कर्मवीरभूमीत समारंभपूर्वक हृद्य सत्कार करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेला मातृसंस्था मानून रयतेच्या विकासासाठी सदैव कार्यरत असणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला या वर्षी एक कोटी ९५ लाख रुपयांची देणगी, शकुंतला रामशेठ ठाकूर यांनी एक कोटी ३० लाख रुपये, तर पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ५९ लाख ९० हजार रुपयांची भरघोस देणगी दिली. त्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, पुस्तक, श्रीफळ, रयत वस्त्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी शकुंतला ठाकूर यांचा सन्मान आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वीकारला.

आपल्या भाषणात पुढे बोलताना खासदार शरद पवार यांनी सांगितले की, कर्मवीर अण्णांनी शिक्षणाचे काम हाती घेतले आणि त्यात आपले सर्वस्व झोकून दिले. अण्णांनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात झाले, तर त्याला खत देण्याचे काम समाजातून झाले. अण्णांचे स्वप्न असलेल्या रयत शिक्षण शिक्षण संस्थेचे विद्यापीठ लवकरच साकारणार आहे.

## मुंबईत दाऊदच्या साथीदारांना दणका

**‘एनआयए’कडून छापे; तिघे ताब्यात**

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी पावले उचलत त्याचे साथीदार आणि पाकिस्तानात बसलेल्या हवाला ऑपरेटर्सच्या विरोधात मुंबईत अनेक ठिकाणी सोमवारी (दि. ९) छापे टाकले. या कारवाईत तीन जणांना ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त आहे.

मुंबईतील सुमारे २० ठिकाणी छापे टाकण्यात आले. ही ठिकाणे दाऊदचे शार्प शूटर, तस्कर, डी-कंपनीचे रिअल इस्टेट मॅनेजर यांच्याशी जोडलेली आहेत. नागपाडा, गोरेगाव, बोरीवली, सांताक्रूझ, मुंब्रा, भेंडी बाजार आदी ठिकाणांचा यात समावेश आहे. छाप्याबाबत माहिती देताना एनआयच्या सूत्रांनी सांगितले की, दहशतवादी आणि अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या साथीदारांच्या घरांवर एनआयएचे छापे सुरू आहेत. अनेक हवाला ऑपरेटर आणि ड्रग्ज पेडलर दाऊदच्या संपर्कात होते. या संदर्भात फेब्रुवारीपासूनच कारवाई सुरू केली आहे.

मुंबईत टाकलेल्या छाप्यात एनआयएने छोटा शकीलचा साडू सलीम फ्रूट याला ताब्यात घेतले आहे. सलीमवर अनेक गुन्हे दाखल आहेत. इतकेच नव्हे; तर त्याच्यावर मोक्कादेखील लावण्यात आला होता. सलीम हा दाऊद इब्राहिमची बहीण हसीना पारकरचा निकटवर्तीय राहिलेला आहे. याशिवाय एनआयएने माहिममधून सुहेल खंडवानी आणि कय्यूम नावाच्या व्यावसायिकाला ताब्यात घेतले. यातील खंडवानीचे सध्या अटकेत असलेले महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांचा मुलगा फराझ मलिकशी संबंध असल्याचा संशय आहे.

## निवडक

### देशद्रोह कायद्याचा केंद्र सरकार करणार फेरविचार

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने देशद्रोह कायद्यासंदर्भात महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. देशद्रोहाच्या भारतीय दंड संहितेच्या कलम १२४ ‘अ’च्या वैधतेची तपासणी आणि पुनर्विचार केला जाईल, असे सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. देशद्रोह कायद्यातील तरतुदींचा पुनर्विचार आणि चौकशी सरकार करीत नाही तोपर्यंत या प्रकरणाची सुनावणी करू नये, अशी विनंतीही सरकारने सर्वोच्च न्यायालयात केली आहे.

### श्रीलंकेच्या पंतप्रधानांचा राजीनामा; संचारबंदी लागू

**कोलंबो** : भारताचा शेजारी देश श्रीलंकेत सध्या सुरू असलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान महिंद्रा राजपक्षे अखेर यांनी राजीनामा दिला आहे. दरम्यान, निदर्शने सुरू असल्याने पुढील सूचना मिळेपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

## एक्स्प्रेस वेवर गॅस टँकर दोन कारना धडकून उलटला; तीन जणांचा मृत्यू



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खोपोली हद्दीत सोमवारी सकाळी (दि. ९) मुंबईला जाणारा एक टँकर पुण्याकडे जाणाऱ्या लेनवरील दोन कारना धडकून उलटला. या अपघातात एका कारमधील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर दोन्हीकडील वाहतूक थांबविण्यात आल्याने एक्स्प्रेस वेवर वाहनांच्या रांगाच रांगा दिसून आल्या.

मिळालेल्या माहितीनुसार गॅस भरलेला टँकर मुंबईच्या दिशेने जात असताना एक्स्प्रेस वेवर खोपोली एक्झिटजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने या टँकरने पुणे लेनवर जाऊन समोरील ॲसेंट व वेरणा अशा दोन कारना धडक दिली व तो उलटला. या अपघातात ॲसेंट कारमधील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये सागर जनार्दन देशपांडे (५१), योगेश सिंग (४७, दोघेही पुणे) आणि चालक मोहम्मद रौफ कय्यम (वडाळा, मुंबई) यांचा समावेश असून दोन जण जखमी असल्याची माहिती मिळत आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघातग्रस्त टँकरमध्ये गॅस भरलेला असल्याने पोलिसांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून एक्स्प्रेस वेवरील दोन्हींकडची वाहने ताबडतोब थांबवली. त्याचप्रमाणे अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले होते. आडवा झालेला टँकर क्रेनच्या साह्याने सुमारे तीन तासांनंतर उभा करण्यात मदत यंत्रणांना यश आले. त्यानंतर वाहतूक पूर्ववत झाली. दरम्यान, या अपघाताची नोंद खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## उमेदवारांना तिकीट देण्याचा अधिकार संजय राऊतांना की उद्धव ठाकरे यांना?

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा टोला



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी या तीन पक्षांचे महाविकास आघाडी सरकार सत्तेत आहे. असे असताना शिवसेना खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादीचा खासदार असलेल्या शिरूरमधून पुढच्या वेळी शिवसेना नेते शिवाजीराव आढळराव पाटील खासदार होतील, असे वक्तव्य केले. त्यावर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी राऊतांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देत टोला लगावला आहे.

शिरूरचे माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील हे पुन्हा संसदेत दिसतील. लोकसभेत आम्ही दोघे एकत्र बसणार आहोत, असे विधान संजय राऊत यांनी केले आहे. ते खेडमधील आंबेगाव येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. पाटील यांच्या उपस्थितीत त्यांच्या निवासस्थानी ही पत्रकार परिषद झाली. विशेष म्हणजे सध्या शिरूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल कोल्हे खासदार आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोघेही महाविकास आघाडीचे घटकपक्ष आहेत. असे असताना संजय राऊतांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, संजय राऊत यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना बरे वाटण्यासाठी ते वक्तव्य केले असावे. उद्या मीपण जिथे शिवसेनेचा खासदार आहे तिथे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना बरे वाटावे म्हणून उमेदवार जाहीर करेन, पण उमेदवार जाहीर केल्यावर मला तिकीट देण्याचा अधिकार आहे की शरद पवारांना आहे? संजय राऊत यांना तिकीट देण्याचा अधिकार आहे की उद्धव ठाकरे यांना आहे?

## अयोध्येत लता मंगेशकर यांच्या नावाने बांधणार चौक

### मुख्यमंत्री योगी आदित्यनाथांची घोषणा

**लखनऊ : वृत्तसंस्था**

भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या सन्मानार्थ अयोध्येत चौक बांधण्यात येणार आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अयोध्या प्रशासनाला या संदर्भात सूचना दिल्या आहेत. मुख्यमंत्री कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या निर्देशात पुढील १५ दिवसांत अयोध्येतील एका मोठ्या चौकाची ओळख करून दिवंगत लता मंगेशकर यांचे नाव देण्यात यावे, असे म्हटले आहे. एवढेच नाही; तर लताजींनी गायलेली प्रभू श्रीराम आणि हनुमानाची भजने शहरात ठिकठिकाणी स्पीकरवर वाजवावेत, असेही नमूद आहे.

लता मंगेशकर यांचे या वर्षी ६ फेब्रुवारी रोजी वयाच्या ९२व्या वर्षी निधन झाले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत ५० हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. २००१मध्ये भारत सरकारने त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च किताब देऊन सन्मानित केले होते.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांचे निर्देश येताच अयोध्या महापालिकेने शहरातील प्रमुख ठिकाणांची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी रामजन्मभूमीकडे जाणाऱ्या मार्गावरील अयोध्येतील मुख्य चौकांची निवड करण्यात येणार असल्याचे म्हटले जात आहे. अयोध्येचे महापौर हृषिकेश उपाध्याय म्हणाले की, येत्या १० दिवसांत एक जागा निश्चित करण्यात येईल.

## केंद्रीय रसायने राज्यमंत्री भगवंत खुबा यांची आरसीएफ थळ प्रकल्पाला भेट




**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्रीय रसायने आणि खते तसेच अपारंपरिक ऊर्जा राज्यमंत्री भगवंत खुबा यांनी रविवारी (दि. ८) राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स लिमिटेड (आरसीएफ)च्या थळ प्रकल्पाला भेट दिली.

केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुबा यांनी आरसीएफच्या उच्च व्यवस्थापनासोबत झालेल्या बैठकीत थळ कारखान्यातील ऊर्जा कार्यक्षमता वाढीसाठी सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला आणि ऊर्जा व पर्यावरण संवर्धनासंबंधीच्या प्रस्तावांवर चर्चा केली. त्यानंतर विविध संयंत्रांना भेट देऊन संबंधित कामांची प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले.

तत्पूर्वी आरसीएफ थळच्या प्रशासकीय इमारतीसमोर वृक्षारोपण तसेच कार्यकारी संचालक यांच्या नूतनीकृत कार्यालयाचे उद्घाटन मंत्री महोदयांच्या हस्ते झाले तसेच भेटीदरम्यान सर्व कर्मचारी व अधिकारी संघटनांच्या प्रतिनिधींची भेट घेऊन आरसीएफने २०२१-२०२२मध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचे मंत्री महोदयांनी कौतुक केले. कोरोना महामारीच्या कठीण काळात केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल कर्मचाऱ्यांचेही त्यांनी अभिनंदन केले. या क्षेत्रात आत्मनिर्भर भारत संकल्पना सुनिश्चित करण्यासाठी आरसीएफच्या योगदानाची त्यांनी प्रशंसा केली.

## बारावीचा निकाल १०, तर दहावीचा २० जूनपर्यंत

**पुणे : प्रतिनिधी**

दहावी आणि बारावीच्या परीक्षांची पेपर तपासणी जवळपास पूर्ण झाली असून बारावीचा निकाल १० जून, तर दहावीचा २० जूनपर्यंत लागेल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिली.



दरवर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षांचे निकाल जाहीर केले जातात. यंदा दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षा सुरू होताच राज्यातील शिक्षक आणि संस्थाचालक संघटनांनी पेपर तपासणीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला होता तसेच कायम विनाअनुदानित शाळा संघटनेच्या असंख्य प्रतिनिधींनी दहावी-बारावीच्या उत्तरपत्रिकांचे गठ्ठे न तपासता ते परत केले होते. यामुळे या दोन्ही परीक्षांच्या पेपर तपासणीवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती, परंतु राज्य शिक्षण मंडळाने नियोजन केल्याने या दोन्ही परीक्षांच्या पेपर तपासणीचे काम सुरळीत सुरू होते. त्यामुळे निकालास तेवढा उशीर होणार नाहीये.

# पीकविम्याचे पैसे तातडीने द्या, अन्यथा आंदोलन!

## आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा राज्य सरकारला इशारा




**मुंबई : प्रतिनिधी**


शेतकऱ्यांऐवजी विमा कंपन्यांचे हितसंबंध जपण्यात रस असलेल्या ठाकरे सरकारला मुंबई उच्च न्यायालयाने चपराक लगावली असून पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांना सहा आठवड्याच्या आत देण्याचे आदेश दिले आहेत. विमा कंपन्यांनी हे पैसे दिले नाहीत तर ठाकरे सरकारने ही रक्कम शेतकऱ्यांना द्यावी असेही न्यायालयाने बजावल्याने आता तरी शेतकरीविरोधाची भूमिका सोडून राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविम्याचे पैसे देण्याकरिता विमा कंपन्यांवर दबाव आणा, अशी मागणी भाजपचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी सोमवारी केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश उपाध्यक्ष सुनील कर्जतकर, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश पॅनेलिस्ट समीर गुरव आदी यावेळी उपस्थित होते.

आमदार पाटील म्हणाले की, २०२० च्या खरीप हंगामात झालेल्या अवकाळीमुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. पावसामुळे सोयाबिन पिकाच्या झालेल्या नुकसानीचा पीक विमा देण्यास कंपन्यांकडून टाळाटाळ होत असतानाही ठाकरे सरकारने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब येथील भाजयुमो कार्यकर्त्यांनी पीकविम्याची भरपाई देण्यात विमा कंपन्यांकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. राज्यातील सरकारच्या निष्क्रियतेमुळे शेतकऱ्यांना न्यायालयात धाव घेऊन न्याय मिळवावा लागतो ही लाजीरवाणी गोष्ट असून न्यायालयाने शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय देताना ठाकरे सरकारलाही कानपिचक्या दिल्या आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यातील सुमारे ४ लाख ५० हजार शेतकऱ्यांनी पीक विम्याचा हप्ता भरला होता. मात्र ८० टक्के शेतकऱ्यांना विमा भरपाई मिळाली नाही. साडेतीन लाख शेतकऱ्यांना सोयाबीन पिकाच्या नुकसानीनंतरही विमा भरपाई देण्यात कंपन्यांकडून टाळाटाळ होत असून हे पैसे विमा कंपन्यांनी सहा आठवड्यांच्या आत न दिल्यास राज्य सरकारने द्यावेत अशा शब्दांत न्यायालयाने ठाकरे सरकारला सुनावले आहे. राज्यभरातील सर्वच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पीकविम्याचे थकलेले दावे सरकारने विमा कंपन्यांना आदेश देऊन निकाली काढावेत, अशी मागणी आ.पाटील यांनी केली. याबाबत चालढकल न करता किंवा न्यायालयाच्या निकालास आव्हान देत वेळकाढूपणा न करता सरसकटपणे राज्यातील शेतकऱ्यांना विमा भरपाई न दिल्यास राज्यातील शेतकऱ्यांच्या असंतोषास ठाकरे सरकारला सामोरे जावे लागेल असा इशारा आ.पाटील यांनी दिला.

# नगर परिषद निवडणुकीसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाकडून एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणाऱ्या व नवनिर्मित अशा एकूण २०८ नगर परिषदांच्या सदस्यपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर झालेला आहे, परंतु सन २०२२च्या महाराष्ट्र अधिनियम अन्वये नगर परिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियमामध्ये सुधारणा केल्यानंतर प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने राज्य शासनाने करण्याची तरतूद करण्यात आली आहे.



या सुधारणेस अनुसरून राज्य निवडणूक आयोगाने २२ फेब्रुवारी घ्या आदेशानुसार राज्यातील एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणाऱ्या व नवनिर्मित अशा एकूण २०७ नगर परिषदांच्या सदस्यपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना कार्यक्रमाबाबत कार्यवाही अधिनियमातील नवीन तरतुदीनुसार राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावी, असे आयोगाने सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) यांना १४ मार्च रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ४ मे रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचनेचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी प्रभागांच्या सीमा दर्शविणारी प्रारूप अधिसूचना १० मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून या तारखेपासून प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या आक्षेप व हरकतीसह सुधारित कार्यक्रमानुसार नव्याने प्राप्त होणाऱ्या आक्षेप व हरकतींवर सुनावणी देण्यात यावी, असे आदेशित केले आहे.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगर परिषदांच्या सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे रहिवाशांच्या माहितीसाठी तसेच हरकती व सूचना मागविण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार संबंधित पालिकांमध्ये १० ते १४ मेदरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत, प्रभाग रचना व प्रभाग दर्शक नकाशे यावर हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत.

# जनताच मतपेटीतून नशा उतरवते; चित्रा वाघ यांचा शिवसेनेवर हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**

नवनीत राणा यांनी जामीन मिळाल्यानंतर लीलावती हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यावर तेथे एमआरआय करताना काढण्यात आलेल्या फोटोवरून शिवसेनेने लिलावतीत जाऊन दादागिरी केली. सत्ता डोक्यात जाते तेव्हा जनताच एक दिवस ती नशा मतपेटीतून उतरवते अशी टिका भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी ट्वीट करत शिवसेनेवर हल्लाबोल केला आहे. वाघ यांनी तो दिवस फार लांब नाही, असे



सूचक विधानही या वेळी केले आहे. राजद्रोहाच्या गुन्ह्याप्रकरणी तुरुंगात गेलेल्या राणा दाम्पत्याला नुकताच अटी-शर्थीसह जामीन मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान, जामीन मिळाल्यानंतर खासदार नवनीत राणा मुंबईतील लिलावती रूग्णालयात उपचार घेत होत्या. त्यावेळी त्यांच्या काही चाचण्या करण्यात आल्या. त्यातील एमआरआय करतानाचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. त्यानंतर मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर आणि मनिषा कायंदे यांनी थेट रूग्णालयात जात लिलावतीच्या प्रशासनाला धारेवर धरत जाब विचारला. शिवसेनेच्या या भूमिकेनंतर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी ट्वीट करत शिवसेनेवर हल्लाबोल केला आहे.

# पावणे येथील आगीची एमआयडीसीतर्फे चौकशी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावणे येथे शुक्रवारी (दि. ६) लागलेल्या आगीत तीन कंपन्या जळून खाक झाल्या. या कंपन्यांना लागलेली आग विझवताना या कंपन्यांमध्ये आगरोधक यंत्रणा कार्यान्वित नसल्याची बाब समोर आली आहे. तरीही या कंपन्या सुरू असल्याने एमआयडीसीचे अधिकारी आणि कंपनी व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

एमआयडीसी प्रशासनातर्फे चौकशी सुरू करण्यात आली असून परवानग्या आणि व्यवस्थापनाचा कारभार तपासला जाणार असल्याचे एमआयडीसी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. पॉलीमर कंपनीला लागलेल्या आगीत एक व्यवस्थापक आणि एक अभियंता अशा दोन जणांचा जळून मृत्यू झाला. या घटनेला दोन दिवस उजाडल्यानंतरही अद्याप पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला नाही.

या कंपन्यांमध्ये असणाऱ्या केमिकल आणि साहित्यांबद्दल माहितीचा अभाव असल्याने आग विझवण्यात अडचणी येत असल्याचे एका जवानाने सांगितले आहे. या प्रकरणी एमआयडीसीचे सर्व अधिकारी कामाला लागले असल्याचे समोर येत आहे.

## जाहीर नोटीस

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप २०२२/प्र.क्र. ०२/का.६, दिनांक २२/०२/२०२२ अन्वये राज्यातील माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणाऱ्या व नवनिर्मीत अशा एकूण २०८ नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम २०२२ जाहिर झालेला आहे.

परंतु सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१. दि. ११ मार्च २०२२ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमामध्ये सुधारणा केल्यानंतर प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने राज्य शासनाने करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

सदर सुधारणेस अनुसरून राज्य निवडणूक आयोगाने दि. २२/०२/२०२२ च्या आदेशानुसार राज्यातील माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणाऱ्या व नवनिर्मात अशा एकूण २०७ नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रमाबाबत पुढील कार्यवाही अधिनियमातील नवीन तरतुदीनुसार राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावी असे आयोगाने सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) यांना दि. १४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र २१ ला मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले व मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. ०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त सुधारणा अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर स्थगित केलेल्या टप्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांची कार्यवाही पुढे सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत.

६/- मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप -२०२२/प्र.क्र. ०२/का-६, दि. २२ फेब्रुवारी २०२२ अन्वये जाहीर करण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणूकांकरीता प्रभागरचनेच्या कार्यक्रमाबाबत मा. राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/नप २०२२/प्र.क्र. ०२/का-६, दि. ०६ मे २०२२ अन्वये परि. १, २ व ३ नुसार सुधारीत कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर कार्यक्रमानुसार नगरपरिषदांच्या निवडणूकांकरीता प्रभागांच्या सीमा दर्शविणारी प्रारूप अधिसूचना दि. १० मार्च २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून दि. १०/०३/२०२२ पासून प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या आक्षेप व हरकतींसह सुधारीत कार्यक्रमानुसार नव्याने प्राप्त होणाऱ्या आक्षेप व हरकतींवर सुनावणी देण्यात यावी असे आदेशित केले

ज्याअर्थी, संदर्भिय आदेश क्र. २ मधील परिशिष्ट-२ (''ब'' वर्ग नगरपरिषदांसाठी) व परिशिष्ट ३ (''क'' वर्ग नगरपरिषदांसाठी) मधील टप्या क्र. अ-१ अन्वये दि. १० मार्च २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या नगरपरिषदांच्या प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यांवर हरकती व सूचना दि. १०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि. १४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत मागविणेबाबत आदेशित केलेले आहे.

संदर्भिय वरील आदेश विचारत घेऊन मी, महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग, मला दिलेल्या अधिकारानुसार, रायगड जिल्ह्यातील माथेरान गिरीस्थान नगरपरिषदचे सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सादर करणेत आलेल्या प्रारूप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे रहिवाशांच्या माहितीसाठी तसेच हरकती व सूचना मागविणेसाठी खाली नमूद दिनांकास आयोजित करण्यात आलेली आहे असे नोटीसीद्वारे जाहीर करीत आहे.

| क्र. | नगरपरिषदेचे नाव | प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे यावर हरकती व सुचना स्विकारणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव पदनाम | प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे यावर हरकती व सुचना मागविण्याचा कालावधी | प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे यावर हरकती व सुचना स्विकारणाऱ्या ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १) | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद | मुख्याधिकारी, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद | दि. १०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि. १४/०५/२०२२ (शनिवार)पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | माथेरान गिरीस्थान नगरपरिषद कार्यालय, ता-कर्जत, जि. रायगड |

सही/-
**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**
जिल्हाधिकारी रायगड,
अलिबाग

# प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी भारतीय जनता पक्षाचा अभिनव उपक्रम



**मुंबई : प्रतिनिधी**

अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचा सीईटी, नीट आणि जेईई सारख्या प्रवेश परीक्षांसाठी योग्य प्रकारे सराव व्हावा या उद्देशाने भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव दिव्या ढोले यांनी मोफत ऑनलाइन मॉक टेस्ट पेपर सिरीयल सेट हा उपक्रम सुरु केला आहे. या संदर्भातील संकेतस्थळाचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नुकतेच अनावरण करण्यात आले.

परीक्षा संपल्यानंतर या प्रवेश परीक्षांचा अभ्यास व सराव करण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. अधिकाधिक प्रश्नपत्रिका दिलेल्या वेळेत सोडविण्याचा सराव व्हावा यासाठी या चाचण्यांचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

त्यासाठी विद्यार्थ्यांनी पोर्टलवर नावनोंदणी करावी लागणार आहे. नोंदणी केल्यावर विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेनुसार प्रत्येक परीक्षेच्या ३० प्रश्नांची प्रश्नपत्रिका उपलब्ध होणार आहे.

या उपक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन उपक्रमाच्या संयोजिका व भाजप प्रदेश सचिव दिव्या ढोले यांनी केले आहे.

# राष्ट्रीय योगा स्पर्धेत सोनिया, पोलकने मारली बाजी

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

आर्ट ऑफ लर्निंग इंस्टिट्यूट आणि लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात आलेल्या राष्ट्रीय योगा स्पर्धेत सोनिया बुरकुले आणि पोलक कुरी यांनी बाजी मारली. सानपाडा येथील साधू वासवानी इंटरनॅशनल स्कूलमध्ये रविवारी (दि. ८) ही स्पर्धा पार पडली.

निरोगी आरोग्यासाठी योगा महत्त्वाचा आहे, याबाबत जनजागृती करण्यासाठी आर्ट ऑफ लर्निंग आणि लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चम्पियनच्या वतीने गेल्या ११ वर्षांपासून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. रविवारी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेचे उद्घाटन भाजप आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते झाले. या वेळी लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियनचे अध्यक्ष प्रताप मुदलियार, योगगुरू डॉ. रिना अग्रवाल, दिनेश अग्रवाल, कविता मुदलियार, प्राचार्या समृद्धी रॉय, अर्जुन सिंघवी, विधी जैन, तुषार दत्ता, विनय अग्रवाल, एन. आर. परमेश्वरन, रत्ना कोठारी आदी उपस्थित होते. बक्षीस वितरण समारंभ पोलीस महानिरीक्षक रणदीप दत्ता आणि ऋतू दत्ता यांच्या उपस्थितीत झाला.

स्पर्धा एकूण आठ गटांमध्ये पार पडली. त्यामध्ये सहा वर्षांच्या मुलांपासून ते ७५ वर्षांच्या वृद्धांचाही समावेश होता. प्रत्येक गटामध्ये प्रथम येणाऱ्या दोन स्पर्धकांचा गौरव करण्यात आला.

प्रथम आणि विशेष प्राविण्य दाखविणाऱ्या २६ स्पर्धकांचा या वेळी सन्मान करण्यात आला. आर्ट ऑफ लर्निंगच्या डॉ. रिना अग्रवाल यांनी योगामध्ये डॉक्टरेट केली आहे. त्यांनी योगासनांबाबत मार्गदर्शन केले.






# कोकणातील शिवसेनेत धुसफूस कायम






## अनिल परब, उदय सामंत यांच्यावर पदाधिकारी नाराज

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात अनेक काळापासून शिवसेनेमध्ये धुसफूस सुरु होती. कोकणातील नेते परिवहन मंत्री अनिल परब आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या कारभारावर स्थानिक पदाधिकारी नाराज आहेत. या पार्श्वभूमीवर ही नाराजी दूर करण्यासाठी मुख्यमंत्री आणि शिवसेनापक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या वर्षा निवासस्थानी बैठक बोलावली आहे. या बैठकीला अनिल परब, उदय सामंत, एकनाथ शिंदे आणि दादा भुसे यांची उपस्थिती आहे.

कोकण किंवा रत्नागिरी जिल्हा हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. गेल्या काही दिवसांपासून ज्या घडामोडी इथं घडत आहेत, त्यावरुन अशा प्रकारची बैठक होऊ शकते याची कल्पना येत होती. पालकमंत्री अनिल परब हे केवळ जिल्ह्यात झेंडावंदना पुरते येतात. निधी वाटपात त्यांचा दुजाभाव असतो, शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांशी त्यांचा संपर्क नसतो, अशा तक्रारी पदाधिकाऱ्यांमध्ये आहेत. त्याचबरोबर उदय सामंत राष्ट्रवादीच्या नेत्यांना इथे कसा पाठिंबा देतात आणि निवडून आणतात याची माहिती देणारा खुद्द सामंत यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यामुळे असे असेल तर इथे आम्ही करायचे काय? असे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, चार तास ही बैठक सुरु होती, यामध्ये अनिल परब आणि उदय सामंत यांच्याविरोधात नाराजी दिसून आली. येत्या काळात कोकणात शिवसेनेकडून शिवसंपर्क अभियान राबवण्यात येणार आहे. याद्वारे कार्यकर्त्यांचा रोष कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. १० मे २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी कल्ब, नवीन पनवेलम, सेक्टर-१९ ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

ग्रामिण लसीकरण

■ काळुंद्रे ■ तळोजा ■ असुडगाव ■ पालेखुर्द ■ रांजणपाडा/पेठ ■ धानसर/तुर्भे

ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२-१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.

# मुंब्रा बायपासवर डिझेल कंटेनर उलटला

## पनवेल-ठाणे मार्गावरील वाहतूक ठप्प

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-ठाणे मार्गावरील मुंब्रा बायपासवर सोमवारी (दि. ९) सकाळी डिझेल कंटेनर उलटल्याने पनवेल-ठाणे मार्ग पूर्णपणे ठप्प झाला. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वाहतूक कासवगतीने सुरू असल्यामुळे बायपासपासून दीड ते दोन किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

मुंब्रा बायपास मार्गावर सोमवारी पहाटे ५.३० वाजण्याच्या सुमारास डिझेलने भरलेल्या कंटेनरने वाहनांची वाहतूक करणाऱ्या कंटेनरला धडक दिली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात डिझेलचा रस्त्यावर सांडले. हा अपघात मुंब्रा देवी मंदिरापासून उतार असलेल्या ठिकाणी घडला. वाहतूक पोलिसांनी तातडीने धाव घेत अग्निशमन दलाच्या मदतीने डिझेलवर माती टाकली तसेच अपघातग्रस्त दोन्ही कंटेनर हटवले, मात्र त्यादरम्यान वाहतूक काही काळासाठी बंद ठेवण्यात आल्याने त्याचा परिणाम इतर कंटेनर वाहतुकीवर झाला.

ही वाहतूक पूर्ववत होत असतानाच ऑईलवरील माती वाहनांमुळे बाजूला सारली गेली आणि निसरड्या रस्त्यावरून घसरून पुन्हा दोन ट्रक एकमेकांना आदळले. अपघातग्रस्त एक ट्रक थेट नाल्यात गेला, तर दुसरा कंटेनर भर रस्त्यात आडवा पडला. ही घटना दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली. दुपारी चारच्या सुमारास नाल्यातील ट्रक बाहेर काढण्यासोबतच रस्त्यात आडवा पडलेला कंटेनर एका बाजूला करण्यात आला. या दरम्यान पनवेल-ठाणे मार्गावरील वाहतूक पूर्ण बंद ठेवण्यात आल्याने वाहनचालक भर उन्हात कोंडीत सापडले. बायपास ते वाय जंक्शनपर्यंत सुमारे दीड ते दोन किलोमीटरच्या वाहनांच्या रांगा लागल्या.

### गतिरोधक दिसलाच नाही!

**मुंब्रादेवी मंदिरापासून उतारावर असलेल्या गतिरोधकाचा अंदाज न आल्याने पहिला अपघात घडल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली. अचानक गतिरोधक दिसल्यामुळे कंटेनरचालकाने ब्रेक दाबला. त्यामुळे मागून वेगाने येणारा कंटेनर त्यावर आदळला व अपघात घडला. बायपास मार्गावर अनेक ठिकाणी असे गतिरोधक असून त्यांना साईडपट्टी अथवा तिथे सूचनाफलक नसल्याने वाहनचालकांना अंधारात अंदाज येत नसल्याने अपघात घडत असल्याचे बोलले जात आहे.**

# लोकअदालतीमध्ये १८ हजार ६६५ प्रकरणे निकाली

## नऊ कोटी ९१ लाख ६१ हजारांची तडजोड रक्कम वसूल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि. ७) झालेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण १८ हजार ६६५ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश संदीप स्वामी यांनी दिली आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशांप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे ठेवण्यात आली होती.

रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील दाखलपूर्व व प्रलंबित अशी एकूण ८० हजार २९० प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी दाखलपूर्व १७ हजार ८९३ व प्रलंबित प्रकरणांपैकी ७७२ प्रकरणे अशी एकूण १८ हजार ६६५ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोकअदालतीमध्ये निकाली निघाली व त्याद्वारे पक्षकारांना एकूण नऊ कोटी ९१ लाख ६१ हजार १३ रूपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली.

रायगडातील विविध न्यायालयांत ४३ लोकअदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोकअदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडिओ कॉलवरूनही काही प्रकरणे मिटविण्यात आली.

### तीन जोडप्यांचा जुळला संसार

**अलिबाग येथील लोकन्यायालयात तीन जोडप्यांचा ज्यामध्ये ज्येष्ठ नागरिक पती-पत्नी होते, त्यांचा आपआपसांतील वाद सामंजस्याने मिटल्यामुळे संबंधित पत्नी हसतमुखाने नांदायला गेली. त्या पक्षकारांचा पॅनलवरील न्यायाधिशांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.**

# पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट कमी करून दिलासा द्यावा

## भारतीय मजदूर संघाची राज्य शासनाविरोधात निदर्शने

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**



गेल्या सात ते आठ महिन्यांपासून राज्यात पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या किंमतींमुळे सामान्यांचे कंबरडे मोडले आहे मात्र राज्य सरकारने पेट्रोल व डिझेलवरील व्हॅट कमी करण्यास नकार दिल्याने रायगड भारतीय मजदूर संघाच्या वतीने सोमवारी (दि. ९) राज्य शासनाविरोधात निदर्शने करण्यात आली. याबाबत तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी भाऊसाहेब अंधारे यांना निवेदन देण्यात आले.

गेल्या काही महिन्यांपासून पेट्रोल व डिझेलच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे. केंद्र सरकारने पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतीत पाच रुपये कमी केले होते. त्यानंतर देशातील उत्तर प्रदेश, हरियाणा, गुजरात, आसाम, गोवा, कर्नाटक, उत्तराखंड यासारख्या अनेक राज्यांनी आपल्या राज्यात पेट्रोल, डिझेलवरील व्हॅट कमी केल्याने तेथील नागरिकांना दिलासा दिला, मात्र महाराष्ट्र सरकारने कुठल्याही प्रकारची कर कपात करण्यास नकार दिल्याने दिवसेंदिवस पेट्रोल व डिझेलच्या किंमती सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे राज्य सरकारविरोधात रायगड भारतीय मजदूर संघाच्या वतीने सोमवारी निदर्शने करण्यात आली.

या पत्रावर राज्य सरकारने त्वरीत योग्य निर्णय घेतला नाही तर भारतीय मजदूर संघ आणखी तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या वेळी भारतीय मजदूर संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटील, उपाध्यक्ष मधुकर पाटील, सचिव महाराष्ट्र प्रदेश ॲड. विशाल मोहिते, धर्माजी पाटील, मंगेश पवार, कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोकण विभागीय लोकशाही दिनी ८ अर्ज निकाली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय लोकशाही दिन सोमवारी (दि. ९) कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली.

या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या २१ असून सोमवारी आलेल्या अर्जांची संख्या दोन असे एकूण प्राप्त अर्ज २३ होते. त्यापैकी आठ अर्ज निकाली काढण्यात आले. सोमवारी रोजी १५ तक्रारी प्रलंबित आहेत. लोकशाही दिनाच्या पार्श्वभूमीवर कोरोना प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या होत्या.





**पनवेल : श्री स्वयंभू गणपती-बालाजी सेवा संस्थानच्या वतीने नवीन पनवेल सेक्टर १ एस येथे ६ ते ८ मेदरम्यान आयोजित श्री बालाजी महोत्सवाला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी नगरसेवक संतोष शेट्टी, भाजप साऊथ इंडियन सेलचे अध्यक्ष श्रीनिवास कोडूरू आदी उपस्थित होते.**

# उरणमध्ये मोफत महाआरोग्य शिबिर

**उरण : बातमीदार**



मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान व वाशी येथील एमजीएम हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य शिबिर रविवारी (दि. १५) सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत उरण नगरपरिषद शाळा, पेन्शनस पार्क, एनएमएमटी बसस्टँडच्यासमोर येथे आयोजित करण्यात आले आहे.

आरोग्य शिबिरात जनरल तपासणी, दंत तपासणी, डोळे तपासणी, रक्तदाब तपासणी, हाडांचे आजार तपासणी, मधुमेह रक्त तपासणी, स्त्रीरोग तपासणी, ईसीजी आदी तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत तसेच ठराविक चष्म्यांवर ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

गरजूंनी रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा, सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन मी उरणकर प्रतिष्ठा, एमजीएम हॉस्पिटल, आर्ट ऑफ लिव्हिंग, त्रिलोचन आय केअर क्लिनिक यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाला विद्यमान आमदार महेश बालदी, भाजप तालुकाध्यक्ष रवीशेठ भोईर, शहराध्यक्ष कौशिक शहा, नगराध्यक्ष सायली म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# धार्मिकस्थळांच्या सुरक्षेबाबत उरण पोलीस ठाण्यातर्फे बैठक

## मार्गदर्शक सूचना केल्या जारी

**उरण : वार्ताहर, बातमीदार**



उरण पोलीस ठाणे हद्दीतील धार्मिकस्थळांचे विश्वस्त, पदाधिकारी, देखरेख करणारे पुजारी यांची पोलीस ठाण्यातर्फे सोमवारी (दि. ९) कोकण ज्ञानपिठ महाविद्यालय येथील कक्षात बैठक घेण्यात आली.

बैठकीमध्ये उपस्थितांना देवदेवतांचे दागिने सुरक्षित ठेवणे, यात्रा उत्सव विहित वेळेत आयोजित करणे, ध्वनिक्षेपकाची परवानगी घेणे, मंदिरासभोवती पुरेशी प्रकाश व्यवस्था करणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, मंदिराचे दरवाजे लावणे, मंदिराचे सुरक्षितेच्या दृष्टीने सुरक्षारक्षक नेमणे आदींबाबत मार्गदर्शन करून सूचना देण्यात आल्या.

या वेळी उपस्थितांना उरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने, पोलीस नाईक भीमराज शिंदे यांनी मार्गदर्शन केले. बैठकीकरीता उरण पोलीस ठाणे हद्दीतील धार्मिक स्थळांचे ६० ते ७० विश्वस्त, पदधिकारी, पुजारी उपस्थित होते.

# पालक-विद्यार्थ्यांनी जूनपूर्वीच आवश्यक दाखले घेण्याचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील पालकांनी जूनमध्ये होणारी धावपळ टाळण्यासाठी पाल्यांना शैक्षणिक कामांसाठी लागणारे विविध प्रकारचे दाखले तत्काळ काढून तहसील कार्यालयाला सहकार्य करण्याचे आवाहन उरणचे निवासी नायब तहसीलदार जी. बी. धुमाळ यांनी केले आहे.

विशेषतः १०वी, १२वी, पदव्युत्तर अभ्यासक्रम व पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना उत्पन्न, जातीचे, नॉनक्रिमिलेअर आदी दाखल्यांची गरज भासते. जून महिन्यापासून शाळा, महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यावर पालक -विद्यार्थ्यांची आवश्यक दाखल्यांसाठी धावपळ सुरू होते. जून महिन्यात नैसर्गिक आपत्ती आणि इतर तत्सम कामांमुळे तहसील कार्यालयावर अतिरिक्त ताण पडतो. यामुळे दाखले मिळविण्यासाठी विलंब तर होतोच. शिवाय विलंबामुळे विद्यार्थ्यांना नाहक शैक्षणिक नुकसानीला सामोरे जावे लागते.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पालक -विद्यार्थ्यांनी मे महिन्यात दाखले काढून तहसील कार्यालयाला सहकार्य करण्याचे आवाहन निवासी नायब तहसीलदार जी. बी. धुमाळ यांनी केले आहे.

# पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी कार्यक्रम व अभिवादन












# राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २०

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरूवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. भारतातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या असलेल्या एलआयसीच्या आयपीओद्वारे सरकारला किती रक्कम मिळणार आहे?**

***अ.*** २१ हजार कोटी रुपये — ***आ.*** ७० हजार कोटी रुपये

***इ.*** एक लाख कोटी रुपये — ***ई.*** १० हजार कोटी रुपये

**२. १०० अब्ज डॉलर इतक्या वार्षिक महसुलाचा टप्पा गाठणारी पहिली भारतीय कंपनी कोणती?**


***अ.*** टीसीएस — ***आ.*** एल अँड टी

***इ.*** एसबीआय — ***ई.*** रिलायन्स इंडस्ट्रीज

**३. मे च्या पहिल्या आठवड्यातील बाजारमूल्यानुसार देशातील वीज क्षेत्रातील सर्वात मोठी सरकारी कंपनी कोणती?**

***अ.*** कोल इंडिया — ***आ.*** पॉवर ग्रीड

***इ.*** एनटीपीसी — ***ई.*** पॉवर फायनान्सकार्पोरेशन (पीएफसी)




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# म्हणे जनतेशी आघाडी!

**आगामी निवडणुकीत आम आदमी पार्टी देशातील कोणत्याही पक्षाशी आघाडी करणार नाही असे सांगताना केजरीवाल यांनी आपली आघाडी ही देशातील १३० कोटी जनतेशीच असेल असे फिल्मी उद्गार काढले आहेत. दिल्ली आणि पंजाब वगळता केजरीवाल यांच्या पक्षाला कुठेही लक्षणीय असे यश मिळालेले नाही. बहुतांश निवडणुकींमध्ये ते आपल्या उमेदवारांच्या अनामत रकमा देखील वाचवू शकलेले नाहीत. तरीही नागपुरात येऊन त्यांनी राणा भीमदेवी थाटात अशी घोषणा केली. वरकरणी पाहता केजरीवाल यांच्या उद्गारांमध्ये फारसे उत्सुकता वाढवणारे काहीच नाही. परंतु राजकीय अभ्यासक मात्र त्यांच्या उद्गारांकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहात आहेत.**

दोन वर्षांवर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुकीच्या रणनीतीबाबत सारेच विरोधी पक्ष चाचपडताना दिसत आहेत. भारतीय जनता पक्षाचा झंझावात इतक्या सहजी रोखता येईल याबाबत आता कुणालाच खात्री उरलेली नाही. सर्व विरोधीपक्षांचे कडबोळे एकत्र बांधून भाजपच्या विजयरथाला लगाम घालण्याचे प्रयत्न गेल्या आठ वर्षांत अनेक वेळा झाले. परंतु दरवेळी ते अपयशी ठरले. सर्वात मोठा विरोधी पक्ष मानला जाणारा काँग्रेस पक्ष स्वत:च इतका समस्याग्रस्त आहे की त्यांना निवडणुकीच्या रणनीतीबद्दल नव्हे तर पक्षाच्या अवस्थेकडेच आधी लक्ष देणे भाग आहे. सुमारे आठ वर्षांपूर्वी प्रचंड बहुमतानिशी सत्तेवर आलेल्या पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विकास कामांचा असा काही धडाका लावला की त्यांना आणि त्यांच्या पक्षाला रोखणे अशक्य होऊन बसले. २०१९ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत हेच चित्र ठळकपणाने सामोरे आले. दोन वर्षांनंतर होणाऱ्या निवडणुकीत देखील तेच कायम राहणार आहे अशी चिन्हे आताच दिसू लागली आहेत. सारांश एवढाच की मोदी सरकारचा पाडाव करणारी शक्ती आजमितीस देशभरातील कुठल्याही पक्षाच्या मनगटामध्ये नाही. त्यामुळे दोन वर्षांनंतर येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत आपली रणनीती नेमकी काय असावी याचा विचार सारेच पक्ष करू लागले आहेत. अजुन तरी त्यांना उत्तर सापडलेले नाही. आम आदमी पार्टीने मात्र आपले धोरण स्पष्टपणे जाहीर करून आघाडी घेतली आहे असे म्हणता येईल. आपचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी रविवारी नागपूरमध्ये झालेल्या कार्यक्रमात आपल्या पक्षाची दिशा स्पष्ट केली. पंजाबमध्ये नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्या. तेथे आम आदमी पार्टीला भरीव यश मिळाले. त्यांच्याच पक्षाचे भगवंत मान मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. हे यश मिळवताना त्यांनी काँग्रेसला भुईसपाट केले. गोव्यातदेखील आपला फारसे यश मिळाले नाही तरी काँग्रेसची मते त्यांनी खाल्लीच. गुजरात विधानसभेच्या गेल्या निवडणुकीतही त्यांनी कळीची भूमिका बजावली होती. या पार्श्वभूमीवर येणाऱ्या काळात आम आदमी पार्टी काँग्रेसचे मनसुबे धुळीला मिळवणार हे लक्षात येते. भारतीय जनता पक्षाला टक्कर देण्याची आपची कुवत नाही, ताकद देखील नाही. आपचे खरे भय काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनाच अधिक आहे, भाजपला नव्हे. आम आदमी पार्टीचा हा एकला चलो रे कार्यक्रम अखेरीस भारतीय जनता पक्षालाच साह्यभूत ठरेल असे दिसते. केजरीवाल यांनी १३० कोटी जनतेशी आघाडी करण्याची भाषा केली असली तरी त्यातील पोकळपणा उघडपणे दिसून येतो हे मात्र खरे.

# महामार्ग चौपदरीकरणाचे ८० टक्के काम पूर्ण




**खबरबात**
**महेश शिंदे**

देशात महामार्गांचे जाळे झपाट्याने विकसित होत आहे. गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेला मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ दुसरा टप्पा पुर्णत्वाच्या दिशेने आहे. यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे कौतुक होत आहे. गेली १२ वर्षे पळस्पे ते इंदापूर महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने कोकणवासीयांना खुपच मनस्ताप सहन करावा लागला होता आणि याचे पाप हे भुजबळांच्या वाट्याला जाते, परंतु तीन वर्षांपूर्वी केंद्रीयमंत्री गडकरी यांच्यामुळे इंदापूर ते पत्रादेवी या दुसऱ्या टप्प्याच्या कामाला सुरुवात झाली. आधुनिक तंत्रज्ञान वापरून उच्च दर्जाचा काँक्रीट महामार्ग आता पूर्णत्वाकडे वाटचाल करीत आहे.

कोकणचे आता खऱ्या अर्थाने स्वप्न साकार होत आहे. चाकरमान्यांची मुंबई आता अगदी जवळ येणार आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ चे जवळपास ८० टक्के काम पुर्ण झाले आहे. या महामार्गावरील बहुतांशी पूल बांधुन त्यांची चाचणी घेऊन वाहतुकीसाठी खुले देखील करण्यात आले आहेत. बहुतांश महामार्गावरुन वाहतूक सुरु झाली आहे. वाहनचालक प्रथमच कोकणात वेगवान ड्रायव्हिंगचा आनंद घेत आहेत. खड्डे आणि घाटातील अवघड वळणे आता इतिहासजमा होणार आहेत. जस जसे महामार्गाचे काम पूर्ण होत आहे तस तशा काही अडचणीदेखील समोर येत आहेत, मात्र तेवढीच त्यावर मात केली जात आहे. पंधरा वर्षांपूर्वी केलेला सर्व्हे आणि आताची स्थिती यात बराच फरक पडला आहे. काही ठिकाणी नाक्यावर वस्ती वाढली आहे. काही ठिकाणी अतिपावसामुळे पाण्याचे प्रवाह बदलले आहेत. मोरीच्या जागी छोट्या पुलांची गरज वाढली आहे, तर महामार्गालगत नागरी वस्ती वाढल्याने अतिरिक्त भुयारी मार्गांची गरज वाढली आहे. काही ठिकाणी भुस्तखलनाचा धोका वाढला आहे. काही ठिकाणी पुराचा धोका वाढला आहे. या सर्वांपेक्षाही यक्षप्रश्न असा निर्माण झाला आहे की महामार्गालगत असलेल्या गावांना महामार्गावरुन प्रवास करता येणार नाही. गावचे जोड रस्ते जे पुर्वी जुन्या महामार्गाला जोडले होते ते आता जोडले जाणार नाहीत. या ठिकाणी कोणत्याही प्रकारची इतर वाहने, बैलगाडी, सायलस्वार यांना चौपदरी महामार्गावर येण्यास रोखण्यासाठी लोखंडाचे बॅरीगेट्स लावले जाणार आहेत. या गावासाठी कोणत्याही प्रकारचे सर्व्हिस रोड नसल्याने महाड तालुक्यातील बऱ्याचशा गावांचा संपर्क तुटणार आहे. जुना महामार्ग आहे त्या स्थितीत ठेवला असता तर या गावाचा संपर्क कायम राहिला असता आणि ज्यांना चौपदरी महामार्गावरुन जायचे नसेल त्यांच्यासाठी एक पर्याय राहिला असता. मात्र समस्या असल्या तरी गेले अनेक वर्षांचे चौपदरीकरणाचे सर्वांचे स्वप्न आता सत्यात उतरत आहे.

मुंबई महाड हे अंतर पाच तासांवरुन तीन तासांवर येणार आहे. तसेच पूर्वीसारखा एकपदरी महामार्ग नसून तीन लेन असणार आहेत. या मुळे अपघातांचे प्रमाण ९० टक्क्यांनी कमी होणार आहे. तसेच सतत होणारी वाहतूक कोंडी होणार नाही. त्यामुळे इंधनाचीही बचत होणार आहे. हेच या नव्या महामार्गाचे वैशिष्ट्य आहे. कोकणाचा पर्यटन आणि औद्योगिक विकास झपाट्याने होणार आहे.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी रायगडचे पोलीस दल सज्ज

रायगड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने महिला पथदर्शी सुरक्षा प्रकल्पाचे उद्घाटन महाराष्ट्र दिनाच्या ६२व्या वर्धापन दिनानिमित्त करण्यात झाले. या प्रकल्पाच्या माध्यमातून महिला व मुले यांची सुरक्षितता व सबलीकरणाच्या अनुषंगाने भरोसा सेल, बडी कॉप, पोलीस काका/पोलीस दिदी, सुरक्षित शाळा, मनोधैर्य योजना, स्वसंरक्षणाबाबत प्रशिक्षण, विशेष बाल पोलीस पथक व महिला दक्षता समिती असे उपक्रम राबविले जातात.

भरोसा सेल-पीडित महिला यांना समुपदेशन कायदेशीर सहाय्य, पोलीस संरक्षण, वैद्यकीय मदत, मानसिक सेवा, तात्पुरता निवारा अशा प्रकारची एकत्रित सुविधा देण्यासाठी भरोसा सेल स्थापन करण्यात आला आहे. आजपर्यंत या सेल अंतर्गत २६२ महिलांचे समुपदेशन करुन त्यांना मदत करण्यात आलेली आहे. बडी कॉप-पोलीस ठाणे हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणी जसे शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालये, खासगी संस्था, खासगी कार्यालये, कंपन्या इ. ठिकाणांच्या नोकरदार महिलांच्या तक्रारी तसेच त्यांनी मदतीची मागणी केल्यास त्यांना त्वरीत व विनाविलंब प्रतिसाद देण्यासाठी बडी कॉप यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. बडी कॉप अधिकारी व अंमलदार यांच्यामार्फत १९९ जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले आहेत. पोलीस काका/पोलीस दिदी-शाळेमधील बालके, लहान मुले/महाविद्यालयातील व अन्य प्रशिक्षण संस्थेतील आश्रमशाळेतील अथवा तत्सम संस्थेतील मुले/मुली यांची सुरक्षा व समस्यांचे निराकारण करण्यासाठी पोलीस काका आणि पोलीस दिदी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. पोलीस काका/पोलीस दिदी यांच्याकडून आजपर्यंत ५४१ शाळांना भेटी देवून २६७ जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सुरक्षित शाळा-रायगड जिल्हा पोलीस दलामार्फत जिल्ह्यातील शाळांमध्ये मुलांना व पालकांना संवेदनशील बनविण्यासाठी सुरक्षित शाळा हा उपक्रम दि आंगण ट्रस्ट या संस्थेच्या मदतीने हाती घेतलेला आहे. या कार्यशाळांना २० शाळांतील उपस्थित १ हजार ८०४ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये कौटुंबिक हिंसाचार, सामाजिक गुन्हेगारी, सायबर गुन्हेगारी इत्यादी विषयांबाबत जनजागृती करण्यात आली. मनोधैर्य योजना- शासन महिला व बाल विकास विभाग यांच्याकडील शासन निर्णयानुसार बलात्कार व ॲसिड हल्ल्यातील पिडीत महिला/बालके व इतर लैंगिक अत्याचारातील पीडित बालके यांना मनोधैर्य योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येते. रायगड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने असे विविध उपक्रम सुरू आहेत. याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे व अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी केले आहे.

**-मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी, रायगड**




## आता इंटरनेटशिवाय चालणार गुगल मॅप

गुगल मॅप्स हे जगातील सर्वात जास्त वापरल्या जाणाऱ्या आणि अतिशय आवश्यक ॲप्सपैकी एक आहे. जेव्हा केव्हा आपल्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जावे लागते तेव्हा गुगलचे हे खास ॲप आपला आधार बनते. गुगल मॅप्स चालवण्यासाठी वापरकर्त्यांना इंटरनेट कनेक्शन आवश्यक आहे. पण गुगलच्या सपोर्ट पेजवर दिलेल्या माहितीनुसार, खराब इंटरनेट कनेक्शन असल्यास युजर्स गुगल मॅप ऑफलाइन देखील वापरू शकतात. गुगल मॅप्स आपोआप ऑफलाइन डाउनलोड केले जाऊ शकतात आणि तुमच्या वर्तमानस्थानावर आधारित अपडेट केले जाऊ शकतात.



हे लक्षात घेण्यासारखे आहे की, गुगल मॅप्स बिल्ट ऑफलाइन वैशिष्ट्य फक्त तुमच्या कारसाठी आहे. या वैशिष्ट्याची उपलब्धता किंवा कार्यक्षमता तुमच्या कारचा निर्माता, स्थान आणि डेटा प्लॅन यावर अवलंबून असते. याशिवाय, हे वैशिष्ट्य सध्या सर्वच देशांमध्ये उपलब्ध नाही. तुम्ही तुमच्या गुगल मॅप्स ऑफलाइनने समाविष्ट केलेल्या क्षेत्राबाहेर गेल्यास तुम्हाला नोटिफिकेशनद्वारे माहिती मिळेल. याशिवाय, तुम्ही गुगल मॅप्सला ऑफलाइन मॅप्स व्यवस्थापित करण्याची परवानगी देखील देऊ शकता. गुगल मॅप्स, कारमधील सेफ्टीशी निगडित रोड साइन इंटिग्रेशन आणि अडॅप्टिव्ह क्रूझ कंट्रोल सपोर्ट या ड्रायव्हर असिस्टंट फीचरच्या सपोर्टसाठी वाहन नकाशा सेवाद्वारे डेटा पुरवतो. ही सुरक्षा वैशिष्ट्ये ऑफलाइन मॅप डेटावर अवलंबून असतात. तुमच्या प्रायव्हसी सेंटरवर जा आणि ऑटो डाउनलोड चालू करा जेणेकरून मॅप डेटा नेहमी उपलब्ध असेल. प्रायव्हसी सेंटरमध्ये ऑटो डाउनलोड असे सुरु करावे-गुगल मॅप्स उघडा आणि तळाशी दर्शविलेल्या सेटिंग्जवर टॅप करा. या नंतर प्रायव्हसी सेंटरवर जा आणि ऑफलाइन मॅप्सवर जा. येथे ऑटो-डाउनलोड ऑफलाइन मॅप्स हा पर्याय निवडा. तुमच्याकडे सक्रिय इंटरनेट कनेक्शन असल्याची खात्री करा आणि ऑफलाइन मॅप डाउनलोड होण्याची वाट पहा. ऑटो-डाउनलोड बंद केले तरी आधीच डाउनलोड केलेले मॅप्स जतन केले जातील. परंतु कोणतेही नवीन मॅप्स आपोआप डाउनलोड होणार नाहीत. ऑफलाइन नकाशे कसे व्यवस्थापित करावे. तुम्ही ऑटो डाऊनलोड केलेले चालू केले असल्यास तुमच्या कारमधील ऑफलाइन मॅपमध्ये गेल्यावर तुमच्या कारच्या हालचालीवर आधारित ऑफलाइन मॅप्स दिसू लागतील. तुम्ही साइन इन केले असल्यास मॅप्स व्यवस्थापित करू शकता.

# कवी ग्रेस यांचा जीवनपट



माणिक सीताराम गोडघाटे ऊर्फ कवी ग्रेस हे मराठी कवी होते. मर्ढेकरोत्तर नवकवींच्या दुसऱ्या पिढीतील प्रमुख कवींमध्ये यांची गणना होते. 'वाऱ्याने हलते रान' या त्यांच्या ललित लेखसंग्रहासाठी त्यांना २०१२ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार देण्यात आला होता. त्यांचे पाच काव्यसंग्रह आणि सात ललित लेखसंग्रह आजवर प्रकाशित झाले आहेत. कवी ग्रेस यांचा जन्म १० मे, १९३७ रोजी नागपूरमध्ये झाला. त्यांचे वडील लष्करी व्यवसायात होते. त्यांची रसिकता उल्लेखनीय होती. माहितीज्ञान पोकळी कर्नल बाग या नागपुरातील वस्तीत त्यांचे कुटुंब राहत होते. ग्रेस यांचे प्रारंभीचे जीवन कष्टमय होते. आईच्या अकाली मृत्यूमुळे विस्कळीत झालेले घर त्यांना सांभाळावे लागले. नोकरी आणि शिक्षण यांच्याशी त्यांना झगडावे लागले. डॉ. लीला माटे यांच्याशी विवाह झाल्यानंतरही हा संघर्ष सुरूच राहिला. एम.ए.ची परीक्षा जवळ आलेली असताना त्यांचा बसचा अपघात झाला. इ.स. १९६६ मध्ये मराठी विषयातील ना.के. बेहरे सुवर्णपदक जिंकून नागपूर विद्यापीठातून माणिक गोडघाटे एम.ए. झाले. प्लास्टर लावलेल्या हातांनी त्यांनी प्रमाणपत्र आणि सुवर्णपदक घेतले. इ.स. १९६६ ते १९६८ या काळात नागपूरच्या धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून त्यांनी काम केले. इ.स. १९६८पासून ते नागपूरच्याच वसंतराव नाईक समाजविज्ञान संस्थेत (मॉरिस कॉलेज) मराठीचे अध्यापन करू लागले. प्राध्यापक म्हणून १९९७मध्ये ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर २००४ पर्यंत नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात मराठी विभागात व ललित कला विभागात संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्यरत होते. 'सौंदर्यशास्त्र' या विषयाचे अध्यापनही या विद्यापीठात त्यांनी केले. इ.स. १९७१ ते १९७६ या काळात दिल्लीच्या भारतीय साहित्य अकादमीच्या मराठी सल्लागार समितीचे ते सदस्य होते. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे १९८२ ते १९८६ या काळात ते सदस्य होते. 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघाच्या मुखपत्राचे १९७१ ते १९७४ या काळात ग्रेस यांनी संपादन केले. मुंबईतील 'संदर्भ' या लेखक केंद्राचेही ते काही काळ संपादक होते.

१९७५ च्या सालात रामदास भटकळ यांनी रायटर्स सेंटर मुंबई या संस्थेचे 'संदर्भ' हे वाङ्मयीन द्वैमासिक सुरू केले. त्याचे संपादन कवी ग्रेस करत होते. 'संदर्भ'चे अवघे दहाबारा अंक निघाले. ग्रेस एखादा विषय प्रत्येक कला क्षेत्रातल्या दिग्गजांना देऊन त्यावर त्यांचे टिपण किंवा लेख मागवत असत. इ.स. १९५८पासून माणिक गोडघाटे यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. इन्ग्रिड बर्गमन या पाश्चात्य अभिनेत्रीच्या अभिनयाने प्रभावित होऊन गोडघाट्यांनी ग्रेस हे साहित्यिक नाव धारण केले. 'दी इन ऑफ द सिक्स्थ हॅपिनेस' या बोलपटात इन्ग्रिडसंबंधीशी इज इन ग्रेस असे वाक्य येते. हा बोलपट पाहत असताना तिने आपल्याला शीळ घातलेली आहे, असे गोडघाट्यांना वाटले. त्या लहरीने आपल्या आत्म्यावरची धूळ उडाली आणि प्रतिभा-रूपाचा पहिला साक्षात्कार आपल्याला इन्ग्रिडमध्ये झाला, तिचे ऋण आठवीत राहण्यासाठी आपण ग्रेस हे नाव धारण केले, असे गोडघाट्यांनी अक्षयकुमार काळे यांना दिलेल्या एका मुलाखतीत म्हटले आहे. वैशिष्ट्यपूर्ण अर्पणपत्रिका आणि स्वतःच्या हस्ताक्षरामध्ये काही ओळी छापण्याची पद्धत या दोन खास गोष्टी संध्याकाळच्या कविता या १९६७ साली प्रकाशित केलेल्या आपल्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी वाचकांना सादर केल्या आणि ती परंपरा त्यांनी पुढेही चालू ठेवली.

**-साभार विकिपिडीया**



**क्लिक...क्लिक...!**

**मुरुड : मुरुड परिसरातील कोळीबांधवांचा मच्छी हंगाम जवळपास संपत चाललेला आहे. त्यात वादळाचे संकेत मिळत असल्याने कोळी बांधवांनी किनाऱ्यावर बोटी आणून मच्छीमारी समुद्र किनाऱ्यापासून जवळ सुरु केली आहे.**
(छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

## फ्रिजमधील थंड पाण्याने हार्ट रेट होतो कमी

उन्हाळ्यात थंड पाणी प्रत्येकाला हवे असते. यात उन्हाळ्यात आपण फ्रिजमधील पाणी पिण्यास प्रथम प्राधान्य देतो. अनेकांना फ्रिजमधील पाणी पिणे किंवा बर्फ खाणे खूप आवडते. तुम्हाला जर फ्रिजमधील पाणी आणि बर्फाचे पाणी पिण्यास आवडत असेल, तर ते तुमच्या शरिरासाठी ते योग्य नाही. फ्रिजमधील पाणी आणि बर्फाचे पाणी पिण्याची सवय असेल तर ती सवय प्रथम सोडायला हवी अन्यथा याचे शरिरावर होणारे दुष्परिणाम तुम्हाला भोगावे लागतील. तुम्ही फ्रिजमधील थंड पाणी पित असाल तर कोणते दुष्परिणाम तुमच्या शरिरावर होतात, हे जाणून घेतले पाहिजे. त्याप्रमाणे



घशात इन्फेक्शन-जेव्हा तुम्ही फ्रिजमधील थंड पाणी पिता तेव्हा त्याचा थेट परिणाम घशावर होतात. ज्यामुळे घशाचे विविध इनफेक्शन होऊन घसा खवखवण्याची शक्यता देखील वाढू शकते. पचनक्रियेत अडथळा- निरोगी शरीरासाठी पचनक्रिया उत्तम असणे, अत्यंत आवश्यक असते, थंड पाण्यामुळे तुमच्या रक्तवाहिन्या कमजोर होतात. पचनक्रियेवर परिणाम झाल्यास तुमच्या शरीरातील अन्नाचे व्यवस्थित पचन होत नाही. थंड पाण्याऐवजी कोमट पाणी पिणे अत्यंत आवश्यक आहे.

ऋतुचक्रानुसार दरवर्षी वेगवेगळे ऋतू येतात आणि जातात. त्यात सर्वांत कठीण असतो तो हिवाळ्यातून उन्हाळ्याकडे होणारा प्रवास. त्यामुळे उन्हाळ्यात काळजी घेणे गरजेचे आहे. ज्याला 'जीवन' म्हटले जाते त्या पाण्याचे खरे महत्त्व समजते ते उन्हाळ्यात. उन्हामुळे कासावीस झालेल्या जिवाला तृप्ती मिळते ती फक्त पाण्यामुळे. उन्हाच्या तडाख्यात कोल्ड्रिंकपेक्षा ताकच भारी असते. तसेच फ्रिजमधील पोषणमुल्ये कमी होतात.

शरीराचे तापमान साधारणपणे ३७ अंश सेल्सिअस असते. पण जेव्हा तुम्ही कमी तापमान असलेले पेय पिता तेव्हा तुमच्या शरीरावर विपरीत परिणाम होतात. त्यामुळे शरीराला पोषणमुल्ये कमी प्रमाणात मिळतात.

थंड अथवा बर्फाचे पाणी पिण्यामुळे हार्ट रेट कमी होण्याची शक्यता असते. थंड पाण्यामुळे एक वेगस नावाची नस उत्तेजित होते. ही १० वी क्रॅनिअल नर्व्ह असल्याने ती शरीराच्या सर्व कार्यावर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. त्यामुळे ही नस उत्तेजीत झाली तर हार्ट रेट कमी होऊ शकतो. यामुळे फ्रिजमधील थंड पाणी पिणे योग्य की अयोग्य हे ठरविणे महत्वाचे आहे.

# अखेर कर्जत तालुक्यात शासकीय टँकर सुरु

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यात पाणीटंचाई सुरु झाली असून, सोमवारी (दि. ९) मोगऱ्ज, पिंगळस या दोन गावांना आणि ताडवाडी, मोरेवाडी, जांभूळवाडी, विठ्ठलवाडी या वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यातील मोग्रज, पिंगळस, धामणी, खांडस, पेठ, भूतीवली, खानंद, अंभेरपाडा, ओलमण, आंत्रट वरेडी, मोहोपाडा, चेवणे, ढाक, नांदगाव, तुंगी, अंतराट, नीड यांचा तर तालुक्यात आनंदवाडी, भगताचीवाडी, काठेवाडी, भल्याचीवाडी, मेचकरवाडी, चौधरवाडी, जांभूळवाडी, बांगरवाडी, पेटरवाडी, चाफेवाडी, वडाचीवाडी, टेपाचीवाडी, मोरेवाडी, ताडवाडी, पाली धनगरवाडा, आसलवाडी, नाण्यांचा माळ, भूतीवलीवाडी, आसल धनगरवाडा, सागाचीवाडी, धामणदांड, बोरीचीवाडी-कळंब, काळेवाडी, मिरचुलवाडी, चिंचवाडी, अंथराटवाडी, बेलवाडी, आषाणे ठाकूरवाडी, नागेवाडी, भागूचीवाडी-१, भागूची वाडी-२, सावरगाव ठाकूरवाडी, ह्याचीवाडी, विकास वाडी, ठोंबरवाडी , गरुडपाडा, चिमटेवाडी, विठ्ठलवाडी, मेंगाळवाडी, तेलंगवाडी, कोतवालवाडी, कळकराई,



बेकरेवाडी, माणगाव ठाकूर वाडी, स्टेशन ठाकूरवाडी, कोतवालवाडी, नवसुचीवाडी, जांभूळवाडी-वारे, खाडचाचापाडा, मधली वाडी, चाहुचीवाडी, मिरचोलवाडी, नारळेवाडी, भोमळवाडी, दामत कातकरीवाडी आणि नांदगाव विठ्ठलवाडी या २३ गावे व ५६ आदिवासी वाड्यांना यंदा पाणीटंचाई भासेल असे गृहीत धरून

## दोन गावे, चार वाड्यांना पाणीपुरवठा

डिसेंबर २०२१मध्ये पाणीपुरवठा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. ही पाणीटंचाई निवारण्यासाठी शासकीय टँकरच्या माध्यमातून पिण्याचे पाणी पुरविण्याची या आराखड्यात तरतूद आहे. त्यानुसार रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने कर्जत तालुक्यातील पाणीटंचाई निवारणासाठी दोन टँकर मंजूर केले आहेत.

मोगरज, पिंगळस या दोन गावांत आणि ताडवाडी, मोरेवाडी, जांभूळवाडी, विठ्ठलवाडी या वाड्यांत पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर तेथील ग्रामस्थांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी कर्जत तालुका पंचायत समितीकडे केली होती. त्यानुसार सोमवारपासून शासकीय टँकर सुरु केले आहेत. मोठ्या लोकवस्तीच्या मोगरज, पिंगळस या गावात रोज, तर ताडवाडी, मोरेवाडी, जांभूळवाडी, विठ्ठलवाडी या वाड्यांत दिवसाआड टँकरद्वारे पाणी पोहचवले जाणार आहे. यापुढे मागणी आलेल्या सर्व टंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांना टँकरचे पाणी दिले जाईल, अशी माहिती कर्जतचे गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी दिली.

### टँकरला जीपीआरएस?

टँकर कोणत्या भागात फिरत आहे याची माहिती मिळावी यासाठी शासनाने पाणी पोहचविणाऱ्या टँकर्सना जीपीआरएस यंत्रणा कार्यन्वित केली आहे. त्यामुळे पाणी घेऊन गेलेला टँकर कोणत्या भागात आहे याची माहिती मिळू शकणार आहे. आता कर्जतमध्येही ही यंत्रणा बसविली जाणार का हे लवकरच समजेल.

**सोमवारपासून मोगरज, पिंगळस या गावात आणि ताडवाडी, मोरेवाडी, जांभूळवाडी, विठ्ठलवाडी या वाड्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. यापुढे मागणी आलेल्या सर्व टंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येईल.**

**-चंद्रकांत साबळे, गटविकास अधिकारी, कर्जत पं. स.**

# पेण खारेपाट तहानलेलाच!

## अधिकाऱ्यांची आश्वासने यंदाही हवेत विरली

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील खारेपाट भागाला १० मेपासून आठवड्यातून एकदाच पाणीपुरवठा होणार असल्याने या भागात मोठी पाणीबाणी निर्माण झाली आहे.

पेण तालुक्यात हेटवणे, शहापाडा, आंबेगाव अशी तीन तीन धरणे असूनदेखील या तालुक्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आहे. तालुक्याच्या पूर्व भागात दुबार पीक घेतले जाते तर खारेपाट भागात पीक सोडाच पण पिण्यासाठीदेखील पाणी मिळेनासे झाले आहे. या भागातील लोकप्रतिनिधींना येथील अधिकाऱ्यांनी एप्रिल अखेर पिण्याचे पाणी नळाद्वारे देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र आता सहा दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जाणार असल्याने या अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींना आश्वासनांची चपराकच लगावली असल्याचे चित्र दिसत आहे.

येत्या ८ ते १० दिवसात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पाणी पेण तालुक्याच्या ग्रामीण भागात पोहचणार आहे. त्यामुळे पुढील आठ ते दहा दिवस कालव्याचे पाणी बंद करू नये, असे पत्र हेटवणे विभागाला देत असल्याची माहिती जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी एस. पी. वेंगुर्लेकर यांनी दिली.

पेणच्या ग्रामीण भागाला पाणी देण्याचे काम ९९ टक्के पूर्ण झाले आहे. फक्त एका जागामालकाचा प्रश्न सोडवायचा आहे. तो ११० मीटरचा प्रश्न निकाली निघाला की येत्या ८ ते १० दिवसात आपण पाणीपुरवठा सुरू करू शकतो. जागा मालकाबाबत तहसील कार्यालयाशी आम्ही संपर्कात आहोत, अशी माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पेण येथील उपअभियंता इ. डी. कोठेकर यांनी दिली.


**मा. गोडसे सो**

प्रो. जमा — वकील समीर श. कांबळे

**जाहीर सूचना**

**पनवेल येथील मा. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात**

मे. ता. — चौकशी अर्ज क्रमांक ४२२/२०२२

२७/६/२०२२ — नि ७/५

श्री. मंदार वसंत घाणेकर — .....अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

वरील अर्जदार यांचे थोरले बंधु श्री. किशोर वसंत घाणेकर यांना दिनांक ०५/०३/२०२१ रोजी नायर हॉस्पिटल मुंबई येथे देवाज्ञा झाली. सदर मयताचे नाव असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे नारंगी तालुका खालापूर जिल्हा रायगड येथील सर्वे क्रमांक ७२, हिस्सा क्रमांक १८, जिचे अदमासे क्षेत्रफळ ० हे - ५२ आर - ०० प्रती तसेच पोट खराबा क्षेत्र ० हे - ९ आर - ०० प्रती एकूण क्षेत्रफळ ० हे - ६१ आर ०० प्रती एवढे क्षेत्र असलेली जमीन मिळकत ह्या अर्जाचा विषय आहे.

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरीत अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा गहेवून त्यांच्या हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे वारस म्हणून दाखल डेल व त्यानंतर आलेल्या हरक्तीचा विचार केला जाणार नाही. आज दिनांक २८/४/२२ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- लिपिक, दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — हुकुमावरु, सही/- सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर पनवेल


# महाडमध्ये क्षुल्लक कारणावरून मारहाण

## दोघे जखमी, चौघांवर गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील इसाने कांबळे येथील मशिदीच्या परिसरात शनिवारी (दि. ७) रात्री क्षुल्लक कारणावरून झालेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले असून, पोलिसांनी या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी अब्दुल काळसेकर (वय २४) यांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार अब्दुल हे नमाजापूर्वी वजू करण्यासाठी जात असताना उन्हेस काळसेकर यांनी त्यांना धक्का दिला. तेव्हा अब्दुल यांनीदेखील उन्हेस याला धक्का दिला. या वादातून हे प्रकरण थेट हाणामारीवर पोहचले. मशिदीतून पठण करून बाहेर येत असताना आदिल खलील काळसेकर, आयुब अजीज काळसेकर, खलील अजीज काळसेकर आणि उन्हेस आयुब काळसेकर यानी एकत्र येत अब्दुल काळसेकर याला बेदम मारहाण करून जखमी केले. जिया काळसेकरदेखील या मारहाणीत जखमी झाले. याप्रकरणी आदिल काळसेकर, आयुब काळसेकर, खलील काळसेकर आणि उन्हेस काळसेकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस नाईक व्हि. एस. काळंगीरे अधिक तपास करत आहेत.


**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर ई- निविदा सूचना**

मनपा मार्फत सन २०२२-२३ व २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ व सन २०२५-२०२६ च्या निविदा मंजूर होईपर्यंत च्या कालावधी करिता साजरे करणेत येणारे विविध कार्यक्रमाची जनजागृती करणे कामी रोड कमानी व होर्डिंग, बॅनर छपाई करणे कामी जाहिर ई निविदा पत्रकात नमुद केलेले साहित्य पुरविणे कामी. (कामाची अंदाजित किंमत रक्कम रुपये २१,०१०८०/- मात्र ) येणे निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामासंबंधीचा सविस्तर तपशील mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जा.क्र. पमपा/भांडार/१२३/२०२२
दिनांक ९/५/२०२२

सही/-
**(तृप्ती सांडभोर)**
अति. आयुक्त
पनवेल महानगरपालिका.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-लोणिवली, ता. पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १५८ | १ | ०-३१-२० पो.ख. ०-२८-८० एकुण ०-६०-०० | ३.६५ | श्री.विठु शामा बरवे श्रीमती. भिमाबाई शामा बरवे |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री,देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक :-०९/०५/२०२२

सही/-
**ॲड. एस के राणे**

**पत्ता :** ऑफिस नं.१२३, पहिला मजला, म्युन्सीपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्कटजवळ, पनवेल, जि. रायगड. ९८१९८६९२१२



**जाहीर नोटीस**

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप -२०२२/प्र.क्र. ०२/का.६, दिनांक २२/०२/२०२२ अन्वये राज्याताल माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणाऱ्या व नवनिर्मीत अशा एकूण २०८ नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२ जाहिर झालेला आहे,

परंतु सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१, दि. ११ मार्च २०२२ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमामध्ये सुधारणा केल्यानंतर प्रभाग रचना राज्य निवडणक आयुक्तांच्या मान्यतेने राज्य शासनाने करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

सदर सुधारणेस अनुसरून राज्य निवडणूक आयोगाने दि. २२/०२/२०२२ च्या आदेशानुसार राज्यातील माहे एप्रिल २०२० ते माचे २०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणाऱ्या व नवनिर्मीत अशा एकण २०७ नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रमाबाबत पुढील कार्यवाही अधिनियमातील नवीन तरतुदीनुसार राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावी असे आयोगाने सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) यांना दि. १४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे,

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र २१ ला मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले व मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. ०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त सुधारणा अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर स्थगित केलेल्या टप्प्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही पुढे सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. .

६/- मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप -२०२२/प्र.क्र. ०२/का.६, दि. २२ फेब्रुवारी २०२२ अन्वये जाहीर करण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणूकांकरीता प्रभागरचनेच्या कार्यक्रमांबाबत मा. राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/नप२०२२/प्र.क्र.०२/का-६, दि. ०६ मे २०२२ अन्वये परि. १, २ व ३ नुसार सुधारीत कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर कार्यक्रमानुसार नगरपरिषदांच्या निवडणूकांकरीता प्रभागांच्या सीमा दर्शविणारी प्रारुप अधिसूचना दि, १० मार्च २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून दि. १०/०३/२०२२ पासून प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या आक्षेप व हरकतींसह सुधारीत कार्यक्रमानुसार नव्याने प्राप्त होणाऱ्या आक्षेप व हरकतींवर सुनावणी देण्यात यावी असे आदेशित केले आहे.

ज्याअर्थी, संदर्भिय आदेश क्र. २ मधील परिशिष्ट-२ (ब वर्ग नगरपरिषदांसाठी) व परिशिष्ट ३ (क वर्ग नगरपरिषदांसाठी) मधील टप्पा क्र, अ-१ अन्वये, दि. १० मार्च २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या नगरपरिषदांच्या प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यांवर हरकती व सुचना दि. १०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि. १४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत मागविणेबाबत आदेशित केलेले आहे.

संदर्भिय वरील आदेश विचारत घेऊन मी, महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग, मला दिलेल्यां अधिकारानुसार, रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरुड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सादर करणेत आलेल्या प्रारुप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे रहिवाशांच्या माहितीसाठी तसेच हरकती व सुचना मागविणेसाठी खाली नमुद ठिकाणी व नमुद दिनांकास आयोजित करण्यांत आलेली आहे असे नोटीसीद्वारे जाहीर करीत आहे.


| क्र. | नगरपरिषदेचे नाव | प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यावर हरकती व सुचना स्विकारणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव पदनाम | प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यावर हरकती व सुचना स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याचा कालावधी | प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यावर हरकती व सुचना स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | खोपोली | मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | खोपोली नगरपरिषद कार्यालय, ता. खालापूर, जि. रायगड |
| २ | अलिबाग | मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | अलिबाग नगरपरिषद कार्यालय, ता. अलिबाग, जि. रायगड |
| ३ | महाड | मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | महाड नगरपरिषद कार्यालय, ता. महाड, जि. रायगड |
| ४ | माथेरान | मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | माथेरान नगरपरिषद कार्यालय, ता. कर्जत, जि. रायगड |
| ५ | मुरुड जंजिरा | मुख्याधिकारी, मुरूड जंजिरा नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालय, ता. मुरूड, जि. रायगड |
| ६ | पेण | मुख्याधिकारी, पेण नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | पेण नगरपरिषद कार्यालय, ता. पेण, जि. रायगड |
| ७ | रोहा | मुख्याधिकारी, रोहा नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | रोहा नगरपरिषद कार्यालय, ता. रोहा, जि. रायगड |
| ८ | श्रीवर्धन | मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय, ता. श्रीवर्धन, जि. रायगड |
| ९ | उरण | मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद | दि.१०/०५/२०२२ (मंगळवार) ते दि.१४/०५/२०२२ (शनिवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ६.०० पर्यंत | उरण नगरपरिषद कार्यालय, ता. उरण, जि. रायगड |

टिप : उरण नगरपरिषदेचे प्रारुप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे व परिशिष्ठ २ नागरिकांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता http:/uranmahaulb.maharashtra.gov.in या वेबसाईअवर तसेच उरण नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

ठिकाण : रायगड - अलिबाग
दिनांक : ९/०५/२०२२
जा.क्र. : उपन/सा.प्र.वि./सु.प्रा.प्र.रचना/४१६/२०२२-२०२३

सही/-
**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**
जिल्हाधिकारी रायगड, अलिबाग


# पाथरज ग्रामस्थांना दूषित पाणीपुरवठा



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील पाथरज गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीच्या वरच्या भागातील तलावात म्हैस मृत झाली आहे. त्या म्हशीच्या शरिराचे अवयव कुजले असल्याने ग्रामस्थांना होणारा पाणीपुरवठा दूषित झाला आहे.

कर्जत तालुक्यातील पाथरज गावात ८० ते ८५ घरांची लोकवस्ती आहे. गावासाठी आठ वर्षापूर्वी जिल्हा परिषद सेस फंडातून विहीर बांधण्यात आली आहे. या विहिरीचे पाणी गावातील टाकीत साठवले जाते. तेथून ते संपुर्ण पाथरज गावाला पुरविले जाते. गावात दोन ते तीन दिवसांपासून दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे. ग्रामस्थांनी विहिरीची पाहणी केली असता, ग्रामस्थांना विहिरींच्या वरच्या भागात असलेल्या तळ्यात म्हैस मरून पडलेली आढळली. ती मृत म्हैस सडून गेली होती. त्या तळ्यातील पाणी पाझरून विहिरीत येते. तेच पाणी पाथरज गावातील टाकीत साठवले जाते आणि ते सर्व पाणी दुर्गंधीयुक्त झाले आहे.

दुर्गंधीयुक्त पाणी पिल्याने काही ग्रामस्थ आजारीसुद्धा पडले आहेत. ग्रामस्थांनी साफ करून विहिरीमधील पाणी बाहेर काढून फेकले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.com Ph. No. 20145 222167**

**निविदा सूचना क्रमांक १० सन २०२२-२०२३ (द्वितीय सूचना)**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, (दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून खालीलप्रमाणे ब-१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेढा तालुका रोहा धान्य गोदाम येथील आवार भिंतीचे बांधकाम करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (डि.पी.डी.सी.) | ६३६२७११/- | ६४०००/- | ११२०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | उप जिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे फायर प्रुफ दरवाजे बसविणे, इत्यादी तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (फायर ऑडिट रिपोर्ट) (डि.पी.डी.सी.) | १५६१२५९/- | १६०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |

**ई-निविदेचे वेळापत्रक (द्वितीय सूचना)**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड करण्याचा व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १५/०५/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २३/०५/२०२२ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक २६/०५/२०२२ वेळ ११.०० वाजता. |

**टिप :-** १) परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२०३४**
**दिनांक : ९/०५/२०२२**
**विमाका/कोवि/२०२२-२०२३/३३**

सही/-
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

## निवडक

### कोळखेतील तरुणाची आत्महत्या

**पनवेल** : अज्ञात कारणावरून एका तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेलजवळील कोळखे गावाच्या हद्दीत घडली. या ठिकाणी राहणाऱ्या सनी मुंडे (वय २३) याने राहत्या घरातील पंख्याला साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वाशीत भरणार सर्वांत मोठे प्रॉपर्टी प्रदर्शन

**नवी मुंबई** : क्रेडाई-बीएएनएमच्या विद्यमाने १३ ते १६ मे दरम्यान वाशी येथे मेगा प्रॉपर्टी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सामान्यांना परवडणाऱ्या घरापासून लक्झरी फ्लॅट प्रदर्शनात उपलब्ध असल्याचे क्रेडाई-बीएएनएमचे अध्यक्ष हरीश छेडा यांनी सांगितले. सुमारे १४० व्यावसायिकांनी प्रदर्शनात सहभाग नोंदवला आहे. नेरळ, खोपोली, कर्जत, रोहिंजण, तळोजा, पुष्पकनगर, द्रोणागिरी, उलवे, पामबीच एनआरआय, पामबीच सानपाडा आदी ठिकाणी आपले गृहप्रकल्प निर्माण करीत असलेले बिल्डर्स मेगा प्रॉपर्टी प्रदर्शनात सहभागी होणार असल्याचे क्रेडाईचे माजी अध्यक्ष भूपेंद्र शाह यांनी वाशी येथील पत्रकार परिषदेत सांगितले. या वेळी क्रेडाईचे माजी अध्यक्ष देवांग त्रिवेदी, धर्मेंद्र करिया, वसंत भद्रा, रसिक चव्हाण आणि भूपेन शाह, जिगर त्रिवेदी, मनिष शाह उपस्थित होते.

# नवी मुंबईत जलउदंचन केंद्राची उभारणी

## ज्वेल ऑफ नवी मुंबई जलाशयाच्या स्वच्छतेसाठी उपाय

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईचे निसर्गसंपन्न आकर्षण केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्वेल ऑफ नवी मुंबई येथील आकाराने अतिशय मोठ्या जलाशयामध्ये आसपासच्या भागातील सांडपाणी येत असल्याने तेथील पाणी दूषित होत आहे. त्यामुळे तांत्रिक पाहणी करण्यात येऊन त्याठिकाणी मलनिःस्सारण वाहिनीची व्यवस्था करण्याचे तसेच जलाशयाकडे जाणाऱ्या सांडपाण्यास प्रतिबंध करण्यासाठी जलउदंचन केंद्र बांधण्याचे काम हाती घेण्यात आले.



या कामाची आयुक्त अभिजीत बांगर यांनी प्रत्यक्ष पाहणी करीत ३१ मेपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. या वेळी अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील, कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे व संबंधित अभियंते उपस्थित होते.

ज्वेल ऑफ नवी मुंबईच्या जलाशयात भरती-ओहोटीनुसार येणारे जाणारे खाडीचे पाणी असावे व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा असू नये याची काळजी घेतली जात असून त्याकरिता ज्वेल ऑफ नवी मुंबईपासून सीवूड मॉलपर्यंत ८० मिमी व्यासाची ५६० रनिंग मीटर लांब मलनि:स्सारण वाहिनी टाकण्यात आलेली आहे. याकरिता तीन द.ल.लि. क्षमतेचे प्रीफॅब्रिकेटेड पम्पिंग स्टेशन उभे करण्यात आलेले आहे.

**जलाशयात जाणाऱ्या सांडपाण्याला प्रतिबंध घातला गेल्याने ज्वेल ऑफ नवी मुंबईचा जलाशय अधिक स्वच्छ होणार असून येथे येणाऱ्या नागरिकांसाठी ती अधिक आनंददायी बाब असणार आहे.**

ही प्रणाली व्यवस्थित रितीने कार्यान्वित राहण्याच्या दृष्टीने २९ चेंबर्स बनविण्यात आलेले आहेत, तसेच करावे होल्डींग पाँड, तांडेल उद्यान, बामणदेव मैदान आणि अमृतानंदमयी मार्ग अशा चार ठिकाणी स्क्रिनिंग व मॅन्युअल गेट बसविले जात आहेत.

ही सर्व कामे मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देतानाच या कामाची बारकाईने पाहणी करीत आयुक्तांनी सद्य स्थिती जाणून घेतली. या जलाशयाच्या पाणथळ भागात सध्या काही प्रमाणात पक्षी दिसत असून येथील पाणी नैसर्गिकरित्या स्वच्छ राहून पक्ष्यांचा अधिवास वाढेल व ज्वेल ऑफ नवी मुंबईच्या सौंदर्यात भर पडेल अशाप्रकारे कार्यवाही केली जात आहे.



**पनवेल : महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १७ मालधक्का झोपडपट्टी येथे मान्सूनपूर्व नालेसफाईला सोमवारी सुरुवात करण्यात आली. या कामाची पाहणी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती वृषाली वाघमारे, महापालिकेचे आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, स्वच्छता निरीक्षक अभिजीत भवर, अशोक अंबेकर, शैला आंबेकर, नंदा टापरे, गुप्ता भाभी, जरिना शेख, मालधक्का झोपडपट्टीचे रहिवाशी अशोक आंबेकर यांनी केली.**

## रिक्षेच्या धडकेत दोघे जखमी

### चालकावर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील दत्ता इन हॉटेलसमोर रस्त्याने चालत जात असताना रिक्षाने दिलेल्या धडकेत दोघे जण जखमी झाले आहेत. रिक्षाचालकाविरोधात (रिक्षा क्र. एमएच ४६ बीपी १६१०) पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहिसर मोरी येथील मोहम्मद मुकीन मोहम्मद रशिद हा त्याचा नातेवाईक सगीर अहमद हे दोघे दहिसर मोरी येथून पनवेल बसस्थानकावर उतरले. रोह्याला जाण्यासाठी ते दत्त इन हॉटेल समोरून रस्त्याने पायी चालत जात असताना एमएच ४६ बीपी १६१०वरील चालकाने त्यांना धडक दिली. या धडकेत रशीद व सगीर यांना गंभीर दुखापत झाली आहे. रिक्षाचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तुरमाळे येथे सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील तुरमाळे येथे अज्ञात चोरट्याने घराच्या बेडरूममध्ये कप्प्यांमध्ये ठेवलेल्या बॉक्समधील ४०६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अज्ञात आरोपीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तुरमाळे येथील अंजली श्याम वांगीलकर यांनी सोन्याचे दागिने हे घराच्या बेडरूममध्ये एका बॉक्समध्ये ठेवले होते. शुक्रवारी (दि. ६) साखरपुड्याच्या कार्यक्रमाकरिता जाण्यासाठी त्यांनी बॉक्स उघडला असता त्यात दागिने नव्हते. त्यांनी दागिन्यांचा शोध घेतला मात्र ते सापडले नाहीत.

१३ एप्रिल रोजी त्यांच्या घरी एअर कंडिशनर सर्विसिंगसाठी दोघे जण आले होते. त्यानंतर १७ एप्रिल रोजी दोघेही त्यांच्या घरी येऊन एयर कंडिशननरला पार्ट बसवून निघून गेले. त्यानंतरही त्यांचे एअरकंडशनर व्यवस्थित होत नसल्याने १९ एप्रिल रोजी ते पुन्हा त्यांच्या घरी आला. एअर कंडिशनर आणि सिलिंगच्या मोकळ्या कप्यामध्ये ठेवलेल्या दागिन्यांच्या बॉक्समध्ये केवळ एक फुटाचे अंतर आहे. त्यामुळे एयर कंडीशनर सर्विसिंगकरिता आलेल्या कामगारानेच दागिने चोरल्याचा त्यांना संशय आहे.

या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## लायन्स क्लब द्रोणागिरीचा पदग्रहण सोहळा

**उरण : वार्ताहर**

येथील भोईर गार्डन येथे लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरीचा पदग्रहण सोहळा मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक गव्हर्नर पि. एम. जे. एफ तावरी, डिस्ट्रिक गव्हर्नर अमरचंद शर्मा, रिजनल चेअरपर्सन ज्योती देशमाने, इ. एक्स. टी चेअरपर्सन गौरी देशपांडे, लायन्स क्लब उलवे जेम्सचे अध्यक्ष मिलिंद पाटील आणि सभासद उपस्थित होते. ढोल -ताशांच्या गजरात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत झाले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गणेश पुजन व दिपप्रज्वलन करण्यात आले.

या वेळी लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरीच्या नवीन कार्यकारिणीने पदभार घेण्यापूर्वी शपथविधी झाला व प्रत्येक लायन्स सभासदास जबाबदारी सोपविण्यात आली.

गौरी देशपांडे व राखी लोणकर यांच्या यांनी सूत्रसंचलन केले. लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरीचे अध्यक्षपद संदीप म्हात्रे यांना देण्यात आले. सेक्रेटरी मोनिका चौकर, खजिनदार सुषमा काळे, सागर चौकर, प्रज्ञान म्हात्रे, भूमिका सिंग, स्नेहा नवाळे, अश्विनी धोत्रे, संदीप देशपांडे, कांचन आसरकर, भारती दत्त, दिपाली गुरव, तनुजा भोईर, राकेश चोणकर, शैलेश डावरे, अश्विनी धोत्रे, वेंडी मिरंडा, रंजना म्हात्रे आदींची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित लायन अध्यक्ष संदीप म्हात्रे यांनी भविष्यात लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरीच्या वतीने मोतिबिंदू कॅम्प व आता पावसाळा सुरू झाल्यावर उरण ते नवी मुंबई परिसरात वृक्षारोपणाची मोहीम हाती घेण्याबाबत सांगितले.

## पामबीच मार्गावर किमान रम्बलर बसवावेत

### वाढते अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांची महापालिकेकडे मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील पामबीच मार्गावर विविध उपाययोजना करूनही अपघात सत्र सुरूच असल्याने वाहतूक पोलिसांनी गतिरोधक अशक्य असल्यास किमान रम्बलर तरी बसवा अशी मागणी पालिकेकडे केली आहे. दरम्यान या संदर्भात वाहतूक पोलीस व पालिका प्रशासन एक संयुक्त बैठक घेऊन याबाबत ठोस निर्णय घेणार आहेत.



तीन दिवसांपूर्वी पामबीच मार्गावर भरधाव वेगाने तिघांचा बळी घेतला. यापूर्वीही असे अनेक अपघात झाले असून हे अपघात सत्र सुरूच आहे.

या मार्गावर वेगमर्यादा ही ६० किमी. प्रतितास इतकी आहे. असे असताना या वेगमर्यादेचे पालन होताना दिसत नाही. रात्रीच्या वेळी तर १०० पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवली जातात. त्यामुळे वाहनावरचा ताबा सुटून या ठिकाणी वारंवार अपघात होत असतात. यावर वाहतूक पोलिसांनी या ठिकाणी स्पीडगनच्या माध्यमातून वाहनांचा वेग रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे मात्र वाहनचालक स्पीडगनच्या टप्प्यात वाहनांचा वेग कमी करतात असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे गतिरोधक बसवण्याची मागणी वाहतूक पोलिसांनी महापालिका प्रशासनाकडे वारंवार केली. महामार्ग असल्याने न्यायालयाच्या निर्देशांनुसार तेथे गतिरोधक बसवता येत नाही, असे महापालिकेचे म्हणणे आहे. बुधवारच्या अपघातानंतर वाहतूक पोलिसांनी गतिरोधक शक्य नसतील तर किमान अपघात होत असलेल्या ठिकाणी रम्बलर तरी बसवा अशी मागणी केली आहे.

**याबाबत महापालिकेकडे गतिरोधकांची मागणी यापूर्वीच करण्यात आली आहे मात्र तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याने निदान रम्बलर बसवावे अशी मागणी केली आहे. हे रम्बलर अपघातस्थळी किमान २० फूट बसवणे अपेक्षित आहे.**
**-दत्ता तोटेवाड, सहाय्यक आयुक्त, वाहतूक पोलीस विभाग**

**द्रुतगती मार्ग नियमानुसार गतिरोधक बसवणे शक्य नाही. त्यामुळे रम्बलर बसविण्याचा विचार आहे. याबाबत लवकरच वाहतूक विभाग आणि पालिका अधिकारी यांच्यात बैठक घेण्यात येणार आहे. यात अपघात रोखण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करण्यात येईल.**
**-संजय देसाई, शहर अभियंता, महापालिका**




# जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचा रॅम्प तोडल्यामुळे रुग्णांचे हाल





**अलिबाग : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अलिबाग येथील जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या मुख्य इमारतीच्या रॅम्पचे दुरुस्तीचे काम सुरु आहे. हे काम अतिशय संथ गतीने सुरु आहे. त्यामुळे रुग्णांचे हाल होत आहेत.

जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या मुख्य इमारतीमध्ये असलेल्या लिफ्टच्या पॅसेजमध्ये पावसाच्या कालावधीत पाणी साठते. त्यामुळे लिफ्ट बंद ठेवावी लागते. पावसाळ्यात रॅम्प नसेल आणि लिफ्ट बंद राहिल्यास रुग्णांना पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर जाताना त्रास सहन करावा लागतो.

कोरोना कालावधीमध्ये आरोग्य व्यवस्थेसाठी अलिबागच्या जिल्हा सरकारी रुग्णालयामध्ये विविध सोयीसुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. मात्र मनुष्यबळाची कमतरता असल्याने आरोग्य व्यवस्थेवर ताण येत आहे. तसेच शवागृहाची झालेली दुरावस्था, इमारतीचा तोडण्यात आलेला रॅम्प, इमारतीला पडलेला खासगी वाहनांचा विळखा अशा विविध समस्येने जिल्हा रुग्णालय ग्रासले आहे.

सध्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. रॅम्प मुख्य इमारतीशी जोडलेला आहे. त्यामुळे तो तोडताना काळजीपूर्वक काम करावे लागते. तसेच संपूर्ण नवीन रॅम्पचे काम पावसाळ्यापर्यंत पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न बांधकाम विभागामार्फत करण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता राजीव डोंगरे यांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वी जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीला टेकू लावण्यात आले होते. इमारत केव्हाही कोसळण्याची स्थिती असल्याने रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक, डॉक्टर, नर्स, वॉर्डबॉय, अधिकारी, कर्मचारी यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. नव्याने इमारत उभारण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केली होती.

# रस्ता पूर्ववत करण्यासाठी कर्जत बेडीसगावमधील आदिवासींचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

**अलिबाग, कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

गावातील वहिवाटीचा रस्ता काही लोकांनी जेसीबी लावून उखडून टाकला आहे. तो रस्ता पूर्ववत करून मिळावा, या मागणीसाठी कर्जत तालुक्यातील बेडीसगाव व आसपासच्या नऊ वाड्यांमधील आदिवासी सोमवारपासून (दि. ९) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले आहेत.

कर्जत तालुक्यातील बेडीसगावातून रस्ता जातो. हा रस्ता नऊ आदिवासी वाड्यांना जोडतो. मागील ४० वर्षांपासून हा वहिवाटीचा रस्ता आहे. रायगड जिल्हा परिषदेने हा रस्ता बांधून दिला आहे. परंतु वांगणी येथील अमोल शेलार व त्याच्या काही सथिदारांनी हा रस्ता जेसीबी लावून उखडून टाकला आहे. त्यामुळे नऊ आदिवासीवाड्यांचा संपर्क तुटला आहे. हा रस्ता उखडत असताना काही आदिवासींनी रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांना जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार देऊनदेखील कोणतीही करवाई करण्यात आलेली नाही.

उखडलेला रस्ता पुर्ववत करून द्यावा, या साठी काही दिवसांपुर्वी कर्जत तहसीलदार कार्यालयासमोर बेडीसगाव ग्रामस्थानी उपोषण केले होते. त्यावेळी रस्ता पुर्ववत करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु रस्ता अजून बनवण्यात आलेला नाही, असे आदिवासींनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

बेडीसगाव गावात जाणारा हा प्रमुख वहिवाटीचा रस्ता आहे. तरीदेखील तो उखडण्यात आला आहे. आता हा रस्ता दुसरीकडून वळविण्याचा प्रशासनाचा विचार आहे. मात्र हा उखडलेला रस्ता पूर्ववत करून मिळावा. रस्ता इतर मार्गाने वळवू नये, अशी या आदिवासींची मागणी आहे. या मागणीची तड लावण्यासाठी कर्जत आदिवासी सेवा संघाचे जिल्हा सचिव गणेश पारधी, कर्जत तालुका अध्यक्ष जैतू पारधी, ग्रामपंचायत सदस्य मंगल पारधी याच्यासह बेडीसगाव ग्रामस्थांनी सोमवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बेडीसगाव येथून २०० हून आदिवासी बांधव अलिबाग येथे पोहचले आहेत.



# महावितरणकडून बिलांसोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवींचा 'शॉक' ; ग्राहकांमध्ये संताप

**पेण : प्रतिनिधी**

महावितरणने ग्राहकांना भर उन्हाळ्यात अतिरिक्त सुरक्षा ठेवींचा शॉक दिला आहे. पेण तालुक्यातही अशीच परिस्थिती आहे. ग्राहकांना सध्याच्या एका महिन्याच्या सरासरी बिलाऐवजी दोन महिन्यांच्या सरासरी बिलांची रक्कम महावितरणाकडे जमा करावी लागणार आहे.

मार्च महिन्याच्या वीज बीलांसोबत पेण तालुक्यातील महावितरणच्या लाखो ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बीले देण्यात आली आहेत. सुमारे आठ हजार कोटी ग्राहकांच्या खिशातून वसूल केली जातील, असा अंदाज आहे. सहा महिन्यात ही सुरक्षा ठेव हप्त्यात भरायची आहे. कंपनीने पाठवलेल्या बिलांत याचा कसलाच उल्लेख नाही. महावितरणने भर उन्हाळ्यात ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा शॉक दिला आहे. ग्राहकांना सध्याच्या एका महिन्याच्या सरासरी बिलाऐवजी दोन महिन्यांच्या सरासरी बिलांची रक्कम महावितरणकडे जमा करावी लागणार आहे.




(छाया : अनिस मनियार)

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात कंपनीने वीजपुरवठा सेवेच्या सुधारित तरतुदी राज्य वीज नियामक आयोगाकडे सादर केल्या होत्या. वीजबिल भरण्यास २१ दिवसांची मुदत दिली जाते. त्यानंतर बिल न भरल्यास १५ दिवसांची नोटीस द्यावी लागते. यासाठी एका महिन्याहून जास्त कालावधी लागत असल्याने दोन महिन्यांच्या सरासरी बिलाएवढी सुरक्षा रक्कम जमा करण्याचे ठरले होते.

बिलांच्या सरासरीचे गणित तयार केले गेले आहे. गेल्या वर्षी त्याच महिन्यातील वीजबिल किंवा गेल्या तीन महिन्यांमधील वीजबिल यापैकी जास्त असलेले बिल सरासरी म्हणून काढली गेली आहे. याच्या दुप्पट रक्कम सुरक्षा ठेव ठेवायची आहे. काही ग्राहकांना दहा हजारांच्या पुढे पैसे जमा करावे लागतील. रीडिंग घेण्यापासून ते देयके येईपर्यंत दोन महिन्याचा कालावधी निघून जातो. त्यानंतर अनेक ग्राहकाकडून विलंबाने देयके भरतात. म्हणून एका ऐवजी दोन महिन्याची सुरक्षा ठेव घेण्याचा प्रस्ताव आहे. याचा अर्थ असा की प्रत्येक घरगुती वीज वापर ग्राहकाला दोन महिन्याची सुरक्षा ठेव या महिन्यात भरावी लागेल. सुरक्षा ठेव रक्कम १७ मे पूर्वी भरायची आहेत. ग्राहकांना बिलांच्या सरासरीवरून अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिल महावितरणच्या वतीने देण्यात आले असून हे बिल सहा टप्प्यामध्ये भरावायचे आहे. यामुळे एखाद्या महिन्याचे बिल ग्राहकाने न भरल्यास त्याचा मीटर काढल्यानंतर डिपॉजिटमधून थकबाकी वजा करून मीटरजोडणी पूर्ववत करण्यात येऊ शकते. अशी माहिती पेण विद्युत मंडळाचे कनिष्ठ अभियंता उमाकांत सपकाळे यांनी दिली.

# कोंढाणे धरणाच्या पाणीवाटपावरून तिढा

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील कोंढाणे येथे उल्हास नदीवर मोठे धरण बांधण्याचा शासनाचा निर्णय झाला आहे, मात्र या धरणातील पाणी राज्य शासनाने नवी मुंबईमधील नैना गृहप्रकल्पांसाठी सिडकोला देण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जत तालुक्याजवळ असलेले मोरबे धरण नवी मुंबई महानगरपालिकेला विकल्यानंतर तेथे असलेल्या नदीमध्ये नवी मुंबई महापालिका एक थेंबदेखील पाणी सोडत नाही. हा अनुभव पाहता कोंढाणे धरण शासनाने सिडकोला विकू नये आणि विकले असल्यास त्यातील काही पाणीसाठा कर्जत तालुक्यासाठी राखून ठेवावा, अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

उल्हास नदीवर कातळदरा येथे धरण व्हावे, अशी मागणी कर्जत तालुक्यातील जनता १९७८पासून करीत आहे. कर्जत तालुक्याच्या ७० टक्के भागातून जाणाऱ्या उल्हास नदीचा अर्धा प्रवास हा कोरडा असतो. त्यामुळे कर्जतला स्वयंपूर्ण करण्यासाठी कोंढाणे धरण व्हायला हवे अशी मागणी आहे.



(छाया : संतोष पेरणे)





कर्जत तालुक्यात कोंढाणे आणि सालपे येथे लघुपाटबंधारे प्रकल्प उभारण्याचे २०११मध्ये तत्कालीन राज्य शासनाने जाहीर केले होते. या प्रस्तावित प्रकल्पामुळे सालपे हे मोठ्या लोकवस्तीचे गाव स्थलांतरित होणार होते. त्यामुळे कोंढाणे येथे कातळदऱ्यामधील पाणी अडवून मध्यम प्रकल्प उभारण्याची मागणी करण्यात आली होती. राज्य सरकारने ती मान्य करून धरणाचे कामदेखील सुरू केले. धरण व्हावे यासाठी फेब्रुवारी २०१३मध्ये कर्जत तालुक्यातील जनतेने एकत्र येत कोंढाणे धरणापासून मंत्रालयापर्यंत लाँगमार्च काढला होता. धरण व्हावे आणि आपला परिसर पाणी येऊन स्वयंपूर्ण व्हावा, असे लाँगमार्चमध्ये सहभागी झालेल्या सर्व शेतकऱ्यांना वाटत होते.

पूर्वीच्या नियोजनानुसार कोंढाणे धरणातील पाणी उल्हास नदीमध्ये सोडले जाणार होते आणि नदीतून ज्यांना हवे त्यांना पाणी उचलण्याची मुभा होती. धरणाचे पाणी उल्हास नदीमध्ये सोडले जाणार असल्याने कर्जतपासून खाली बदलापूरपर्यंतची पाणीटंचाई कायमची दूर होणार होती.

### दोन गावांचे पुनर्वसन आवश्यक

उल्हास नदीवर बांधण्यात येणाऱ्या या धरणासाठी एकूण ४२५ हेक्टर जमीन लागणार असून त्यापैकी १२२ हेक्टर जमीन खासगी आहे. या धरण प्रकल्पात कोंढाणे आणि चोची ही दोन गावे विस्थापित होणार असून ११८ कुटुंबांचे धरणापासून आठ किमी लांब असलेल्या शासकीय जमिनीत पुनर्वसन होणार आहे. कोकण पाटबंधारे विभागाला या प्रकल्पाचा खर्च तीनशे कोटी रुपये अपेक्षित होता, मात्र गेली आठ वर्षे हा प्रकल्प रखडला आहे. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या पर्यावरण व वन विभागाची ना हरकत प्रमाणपत्रे अद्याप प्रलंबित आहेत. प्रकल्प अहवाल तयार करणारी कंपनी या प्रकल्पाचा सुधारित खर्च तयार करणार आहे. तो पूर्वीपेक्षा दुप्पट होण्याची शक्यता आहे.

### कोंढाणे धरणाबाबत सिडकोकडील माहिती

दोन वर्षांपूर्वी हे धरण शासनाकडून सिडकोला हस्तांतरित करून घेण्यात आले आहे. भविष्यात झपाट्याने विकसित होणाऱ्या नैना क्षेत्रातील रहिवाशांची तहान भागविण्यासाठी नवी मुंबईपासून ३५ किलोमीटर लांब असलेल्या कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरणाचा सिडको नव्याने प्रकल्प अहवाल तयार करणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे या भागाचा नियोजनबद्ध विकास व्हावा म्हणून शासनाने २७० गावांलगतचे ४७४ किलोमीटर क्षेत्र हे नवी मुंबई विमानतळ प्रभावित क्षेत्र अर्थात नैना क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या क्षेत्रात विमानतळ, एसईझेड, कॉर्पोरेट या व्यावसायिक उपक्रमांबरोबर नैना नागरी क्षेत्र विकसित होणार आहे. या सर्व क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात पिण्याचे पाणी लागणार असल्याने या प्रकल्पाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे नैना क्षेत्रापासून ३० ते ३५ किमी लांब आणि कर्जत शहरापासून १३ किमी दूर असलेल्या कोंढाणे धरणाचा पर्याय निवडण्यात आला आहे.

या धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय सिडको घेत आहे, पण ७१ मीटर उंचीच्या या धरणात आता २० दशलक्ष घनमीटरऐवजी १०५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा होणार आहे. यातील तीन दशलक्ष घनमीटर पाणी हे सिंचनासाठी वापरण्यात येणार असून यामुळे २४० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकते. सिडकोला या धरणातील ९४ दशलक्ष घनमीटर पिण्याच्या पाण्याची अपेक्षा आहे. हे सर्व होत असताना कर्जतची गरज भागवून नंतर इतरत्र पाणी द्यावे, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

### कर्जतला पाण्याची गरज

*कर्जत तालुक्याचे वाढते नागरीकरण लक्षात घेता या भागाला खऱ्या अर्थाने पिण्याच्या पाण्याची गरज आहे. शासनाने सिडकोला विकलेले धरण रद्द करून कर्जत तालुक्यासाठी हे धरण आरक्षित करावे, अशी मागणी माजी आमदार सुरेश लाड यांची आहे, तर विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांची हे धरण व्हावे, अशी मागणी आहे. राज्य सरकारमधील हे दोन्ही पक्ष धरणाबाबत भूमिका घेत असताना आमदार थोरवे यांच्या पत्रानंतर या धरणाबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी बैठक घेऊन आजी–माजी आमदार यांचे मत विचारात घेतले जाईल, असे स्पष्ट केले आहे. भारतीय जनता पक्षाने स्थानिकांची ४० वर्षांपासूनची मागणी पुन्हा एकदा पुढे केली असून धरण झाल्यास कर्जत तालुक्यासाठी पाणीसाठा राखून ठेवावा आणि धरणाचे पाणी ४५० हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्यासाठी देण्याची मागणी केली आहे. त्यामुळे हे धरण दोन वर्षांनंतर आता पुन्हा चर्चेत आले आहे.*

# कर्जतमध्ये महापुरुषांच्या नावाच्या पाट्या

**कर्जत : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत तब्बल ५० लाख खर्चून कर्जत शहरात महापुरुषांच्या नावांचे १९० फलक लागले आहेत. स्वच्छ सर्वेक्षण आणि माझी वसुंधरा अभियानमध्ये मोठे नामांकन मिळविण्यासाठी कर्जत शहराचे हे बदललेले रूप महत्वाचे ठरणार आहे.

कर्जत शहरात आलेल्या नवख्या माणसाला निश्चित स्थळी जाण्यासाठी उपयोग व्हावा, यासाठी पालिकेने केलेल्या कामाचे बक्षीस यापूर्वी मिळाले आहे. त्या बक्षिसाच्या निधीमधून कर्जत शहरात साइन बोर्डच्या माध्यमातून महापुरुषांच्या नावाचे फलक दिसू लागले आहेत. हे काम अंतिम टप्प्यात आहे.

आपल्या शहराला भूषण असलेल्या समाजातील यांची नावे वेगळ्या स्थळांना त्यांना आणि पदपथ तसेच उद्याने यांना असावीत असे मला सातत्याने वाटत होते. त्यामुळे नगरसेविका म्हणून पाच वर्षे विचार केला होता.



### एकूण १९० फलक लावले

शहरातील दहिवली भागातील उद्यानांना सद्गुरुकृपा उद्यान, साईनगर उद्यान, सुवर्णजयंती उद्यान, नाना नानी पार्क, मीनाताई ठाकरे उद्यान अशी नावे देण्यात आली आहेत. कर्जत शहरात असे १९० बोर्ड लावले जात आहेत, अशी माहिती नगरपालिकेच्या वतीने देण्यात आली. त्यामुळे शहराचे रूपडे पालटले आहे. कर्जत शहरातील रस्त्यांना महापुरुषांची नावे देण्यात आली आहेत.शहरात प्रवेश केल्यानंतर मुख्य रस्त्याला निरुपणकार तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांचे नाव दिले जात आहे.

> **शहरातील चौक, रस्ते, उद्याने यांना महापुरूषांची नावे देण्यात येत आहेत. स्वच्छ सर्वेक्षण अभियान आणि माझी वसुंधरा अभियान यासाठी हे वेगळे काम महत्त्वाचे ठरेल.**
> **–सुवर्णा जोशी, नगराध्यक्षा, कर्जत नगर परिषद**

शहराच्या मुख्य रस्त्यांना तालुक्यातील दोन हुतात्मे भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांची नावे तसेच प्रबोधनकार ठाकरे, स्वातंत्र्य सावरकर, वासुदेव बळवंत फडके, कर्जत शहरातील स्वतंत्रसैनिक बाळासाहेब ठोस यांच्यासह भारतरत्न डॉ. एपी अब्दुल कलाम, बाळासाहेब ठाकरे, हुतात्मा बाबू गेनू, बसवेश्वर महाराज, जनरल अरुणकुमा वैद्य, सरखेल कान्होजी आंग्रे, गाडगेबाबा यांच्यासह क्रांतिकारकांची देण्यात आली आहेत.

# माडप येथे आरोग्य तपासणी, दाखले वाटप शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

आदिवासी सप्तसूत्री व कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत माडप येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्र आणि खालापूर तहसील कार्यालय यांच्या माध्यमातून आदिवासी महिलांसाठी दाखले वाटप आणि आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून शिबिराची सुरुवात करण्यात आली. लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सीमा पाईकराव यांच्या मार्गदर्शनाखाली या वेळी आदिवासी महिलांची रुटिंग तपासणी करण्यात आली. यामध्ये असंसर्गजन्य आजारांचे निदान व उपचार करण्यात आले तसेच खालापूर तहसील कार्यालयाच्या वतीने मंडळ अधिकारी तुषार कामत यांच्या मार्गदर्शनाखाली जातीचे दाखले, वयाचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, रेशनकार्डमध्ये नावे टाकणे तसेच नवीन रेशन कार्ड देण्यात आले.

पंचायत समितीचे माजी उपसभापती विश्वनाथ पाटील, कृषी अधिकारी नितीन महाडिक, महिला व बालविकास प्रकल्पाच्या सुजाता सकपाळ, तानाजी ढाकवळ, नितीन पाटील, नितीन ठाकूर, शारदा वाघमारे, डॉ. अभिजित झुरे, आरोग्य निरीक्षक गजानन बडदडे, धर्मा भस्मा, औषध निर्माण अधिकारी सोनाली गाढे, आरोग्यसेविका माधुरी म्हात्रे, लॅब टेक्निशियन दीपाली बांदल, दिनेश पाटील, संजय गांधी निराधार अव्वल कारकून सचिन वाघ, महसूल सहाय्यक रविकांत वाघपैजे, पुरवठा अधिकारी रवी सोनकांबळे, पोलीस पाटील रेणुका पाटील, ग्रामसेवक अजय फोफेरकर, ग्रामदक्षता कमिटी सदस्य कमलाकर पाटील, नथुराम कांगे, रवी पाटील, गणेश मालकर यांच्यासह आदिवासी महिला या शिबिराला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | लखनऊ वि. गुजरात सायं. ७.३० वा., पुणे

## कुमार-कुमारी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

# कोल्हापूर, पालघर विजेते





**पुणे : प्रतिनिधी**

पुणे बालेवाडी येथे झालेल्या ४८व्या राज्यस्तरीय निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कुमार गटात कोल्हापूर आणि कुमारी गटात पालघर संघ विजेता ठरला.

मुलींच्या अंतिम सामन्यात पालघर संघाने पुणे संघावर ३२-३० अशी मात करीत स्पर्धेचे अंतिम विजेतपदासह स्व. चंदन पांडे (परभणी) फिरता चषकावर आपले नाव कोरले. पालघर जिल्ह्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदा त्यांनी ही किमया साधली. पहिल्या डावातील पाचव्या मिनिटाला लोण देत पालघरने सामन्यात आघाडी घेतली, पण पुण्याने त्याच डावात त्या लोणाची परतफेड केली. गुणांच्या चढाओढीमुळे दोन्ही संघ मध्यंतराला १९-१९ अशा समान गुणांवर होते. मध्यंतरानंतर दोन्ही संघाने आक्रमक खेळ केला. सामना संपायला शेवटची काही मिनिटे शिल्लक असताना २७-२७ अशी बरोबरी असताना पुण्याने बोनस गुण मिळविण्याचा प्रयत्न केला नाही. त्या वेळी जुली मिस्किटाने आपल्या एकाच चढाईत तीन गडी टिपत पालघरला आघाडीवर नेले आणि शेवटी दोन गुणांनी बाजी मारली. पालघरच्या हर्षा शेट्टी हिने पाच गुण, तर जुली मिस्कीटा हिने १३ गुण मिळवित विजयात मोठा वाटा उचलला.

मुलांच्या अंतिम सामन्यात कोल्हापूर संघाने मुंबई उपनगर संघावर ४०-२७ असा दणदणीत विजय मिळवित स्व. नारायण नागो पाटील (रायगड) या फिरत्या चषकासह विजेतेपद पटकाविले. चार वर्षांपूर्वी परभणीतील सेलू येथे झालेल्या कुमार गट स्पर्धेत कोल्हापूरने विजेतेपद प्राप्त केले होते. त्यानंतर चार वर्षांने त्यांनी ही किमया साधली. मध्यंतराला कोल्हापूर संघाकडे २४-९ अशी भक्कम आघाडी होती. कोल्हापूरने सामन्याच्या सुरुवातीपासून सामन्यावर पकड ठेवली होती. कोल्हापूरच्या कुणाल जगताप याने खोलवर चढाया करीत ११ गुण, तर स्वराज्य साळवी याने तीन गुण मिळविले. त्यांना दादासो पुजारीने सुंदर पकडी घेत सहा गुण व साईप्रसाद पाटील याने दोन गुण वसुल करीत चांगली साथ दिली. सांगलीच्या मुलींनी आणि मुलांमध्ये पालघर संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

# चेन्नईची दिल्लीवर एकतर्फी मात



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी रात्री झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने दिल्ली कॅपिटल्सला ९१ धावांनी धूळ चारत एकतर्फी विजय नोंदवला. चेन्नईने दिल्लीसमोर विजयासाठी २०९ धावांचे आव्हान ठेवले होते, मात्र पूर्ण गडी बाद होईपर्यंत दिल्लीला फक्त ११७ धावा करता आल्या. या पराभवानंतर आता दिल्लीसाठी प्लेऑफपर्यंत पोहचण्याची शर्यत आणखी कठीण होऊन बसली आहे.

चेन्नईने दिल्लीसमोर विजयासाठी २०९ धावांचा डोंगर उभा केला होता. ही धावसंख्या गाठताना दिल्लीचा एकही फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. सलामीला आलेले डेविड वॉर्नर (१९) आणि श्रीकर भारत (८) स्वस्तात बाद झाले. दुसऱ्या आणि तिसऱ्या विकेटसाठी आलेल्या मिचेल मार्श (२५) आणि ऋषभ पंत (२५) या जोडीने समाधानकारक धावा करीत दिल्लीला विजयापर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. यानंतर मधल्या फळीतील शार्दुल ठाकुर वगळता सर्वच फलंदाजांनी निराशा केली. शार्दुलने १९ चेंडूमध्ये २४ धावा केल्या. रोवमन पॉवेल (३), रिपाल पटेल (१), लगेच तंबूत परतले. शेवटच्या फळीतील कुलदीप यादव अनरीच नॉर्टजे (१, नाबाद) खलील अहमद (०) यांनादेखील जास्त काळासाठी मैदानावर तग धरता आली नाही. परिणामी चेन्नईचा ९१ धावांनी विजय झाला.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून दिल्ली कॅपिटल्स संघाने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या चेन्नई संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी केली. सलामीवीर ऋतुराज गायकवाड आणि डेवॉन कॉन्वे या जोडीने शतकी भागिदारी केली. संघाच्या ११० धावा झालेल्या असताना अकराव्या षटकात ऋतुराज बाद झाला. त्याने ३३ चेंडूमध्ये ४१ धावा केल्या.

यानंतर आलेल्या शिवम दुबेनेही समाधानकारक खेळी केली. त्याने १९ चेंडूमध्ये ३२ धावा केल्या. कॉन्वे अर्धशतकी खेळी करून ८७ धावांवर झेलबाद झाला. त्याने सात चौकार आणि पाच षटकार लगावत ही धावसंख्या उभारली. कॉन्वे-दुबे या जोडीने ५९ धावांची भागीदारी केली.

## राजस्थानचा शिमरॉन हेटमायर मायदेशी परतला



**गयाना : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या सर्वच लढती सध्या अटीतटीच्या होत असून प्लोऑफपर्यंत पोहचण्यासाठी सर्वच संघांना विजय आणि पराभव महत्त्वाचा ठरतोय. असे असताना राजस्थान रॉयल्स संघातील दिग्गज खेळाडू शिमरॉन हेटमायर मायदेशी परतला आहे.

मूळचा वेस्ट इंडिजचा आणि आयपीएलमध्ये राजस्थानकडून खेळणारा शिमरॉन हेटमायर आयपीएल सोडून त्याच्या गयाना येथील घरी गेला आहे. यामागचे कारणही तसेच खास आहे. त्याच्या पत्नीने नुकतेच एका बाळाला जन्म दिला असून तो पहिल्यांदाच बाबा झाला आहे. आपल्या पहिल्यावहिल्या बाळाला पाहण्यासाठी तो घरी गेला आहे. लवकरच तो परतणार आहे. तशी माहिती खुद्द हेटमायरने दिली असून त्याचा एक व्हिडीओदेखील राजस्थान रॉयल्सने समाजमाध्यमांवर शेअर केला आहे.

# बंगळुरूने हैदराबादवर साकारला दणदणीत विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी दुपारच्या सत्रात झालेल्या लढतीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने सनरायझर्स हैदराबादवर ६७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. बंगळुरुने दिलेले १९३ धावांचे लक्ष्य गाठताना हैदराबादला सर्व गडी बाद १२५ धावांपर्यंतच मजल मारता आली.

बंगळुरूच्या विजयासाठी वनिंदू हसरंगाने नेत्रदीपक कामगिरी केली. त्याने पाच बळी घेतले, तर फलंदाजीमध्ये फॅफ डू प्लेसिसचे अर्धशतक आणि दिनेश कार्तिकने उपयुक्त खेळी केल्यामुळे बंगळुरूला हैदराबादसमोर १९२ धावांचा डोंगर उभा करता आला.

बंगळुरूने विजयासाठी दिलेल्या १९३ धावांचे लक्ष्य गाठताना हैदराबादची दमछाक झाली. हैदराबादला पहिल्याच षटकात दोन मोठे धक्के बसले. सलामीला आलेले अभिषेक शर्मा आणि केन विल्यम्सन शून्यावर बाद झाले. दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या राहुल त्रिपाठीने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला. त्याने अर्धशतकी खेळी करीत ३७ चेंडूवर ५८ धावा केल्या. त्रिपाठी वगळता हैदराबादच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही.

बंगळुरुच्या गोलंदाजांसमोर हैदराबादचे फलंदाज तग धरू शकले नाहीत. मधल्या फळीतील ऐडन मर्कराम



(२१), निकोलस पूरन (१९) यांनी समाधानकारक खेळी केली. त्यानंतर मात्र एकाही फलंदाजाला १०पेक्षा जास्त धावा करता आल्या नाहीत. १०४पासून १२५ धावांपर्यंत पोहचताना हैदराबादचे सहा फलंदाज बाद झाले. जगदिशा सूचित (२), शशांक सिंग (८), कार्तिक त्यागी (०), भुवनेश्वर कुमार (८), उमरान मलिक (०), फझलहक फारुकी (२ नाबाद) यांनी निराशा केली.

याआधी बंगळुरू संघाने नाणेफेक जिंकून सुरुवातीला फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र या संघाची खराब सुरुवात झाली. पहिल्याच षटकात पहिल्या चेंडूवर सलामीला आलेला विराट कोहली शुन्यावर बाद झाला. त्याला खातेदेखील खोलता आले नाही. कोहली बाद झाल्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या रजत पाटीदारने धडाकेबाज फलंदाजी केली. त्याने ३८ चेंडूमध्ये ४८ धावा करीत संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला.

सलामीला आलेल्या फॅफ डू प्लेसिसनेही नाबाद अर्धशतकी खेळी करीत ५० चेंडूमध्ये ७३ धावा केल्या. आठ चौकार आणि दोन षटकार यांच्या जोरावर त्याने ही किमया साधली. ग्लेन मॅक्सवेलनेही ३३ धावा केल्या. शेवटी दिनेश कार्तिकने तर चौकार आणि षटकार यांचा पाऊस पाडत फक्त आठ चेंडूमध्ये चार षटकार आणि एक चौकार लगावत ३० धावा केल्या. कार्तिकने आक्रमक खेळी केल्यामुळे बंगळुरु संघाने १९२ धावांपर्यंत मजल मारली.

## थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धा

# भारतीय पुरुष संघाची विजयी सलामी



**बँकॉक : वृत्तसंस्था**

भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाने जर्मनीला ५-० अशी धूळ चारत थॉमस चषकाच्या आपल्या मोहिमेची विजयी सुरुवात केली.

पहिल्या सामन्यात जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या लक्ष्य सेनने मॅक्स विसकिर्चेनवर २१-१६, २१-१३ अशी सहज मात केली. त्यानंतर दुहेरीच्या सामन्यात सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने जोन्स रॅल्फी यान्सेन आणि मार्व्हिन सिडेल जोडीवर २१-१५, १०-२१, २१-१३ असा विजय मिळवला. एकेरीच्या दुसऱ्या लढतीत जागतिक क्रमवारीत ११व्या स्थानी असलेल्या किदम्बी श्रीकांतने पिछाडीवरून पुनरागमन करीत काइ शेफरला १९-२१, २१-९, २१-११ असे नमवत भारताला एकूण लढतीत ३-० अशी विजयी आघाडी मिळवून दिली.

एमआर अर्जुन आणि ध्रुव कपिला जोडीने दुहेरीच्या दुसऱ्या लढतीत ब्योर्न गीस आणि यान कॉलिन व्होएल्करला २५-२३, २१-१५ असे पराभूत केले. मग एचएस प्रणॉयने अखेरच्या सामन्यात मॅथियास किकलिट्जचा २१-९, २१-९ असा पराभव करीत भारताला एकतर्फी विजय मिळवून दिला.

## दिल्ली संघाचा पृथ्वी शॉ आजारी; रुग्णालयात दाखल



**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्ली कॅपिटल्सच्या एका गोलंदाजाला कोरोनाची लागण झाल्यानंतर दिल्लीचाच दिग्गज खेळाडू पृथ्वी शॉ आजारी असल्याचे समोर आले आहे. अंगात ताप भरल्यामुळे त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

आयपीएलमध्ये रविवारी रात्री दिल्ली आणि चेन्नई यांच्यात सामना झाला. या सामन्यात चेन्नईने दिल्लीचा पराभव केला. सामन्याला काही तास शिल्लक असताना दिल्लीचा खेळाडून पृथ्वी शॉ अचानकपणे आजारी पडला. ताप आल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार चेन्नईविरोधातील सामन्याआधी नेटमध्ये सराव करणाऱ्या दिल्लीच्या एका गोलंदाजाला कोरोनाची लागण झाली आहे. या गोलंदाजासोबत ज्या खेळाडूंनी रुम शेअर केलेली आहे, त्या सर्वांनाच विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. एकीकडे पृथ्वी शॉ आजारी पडला आहे, तर दुसरीकडे संघासमोर कोरोनाचे संकट उभे ठाकले आहे. त्यामुळे दिल्ली संघाच्या अडचणी वाढल्या आहेत.

## प्रीमियर लीग फुटबॉल

# लिव्हरपूल-टॉटनहॅम सामन्यात बरोबरी

**लिव्हरपूल : वृत्तसंस्था**

प्रीमियर लीग फुटबॉलमध्ये लिव्हरपूल आणि टॉटनहॅम या बलाढ्य संघांतील सामना १-१ असा बरोबरीत सुटला. या निकालामुळे लिव्हरपूलने (३५ सामन्यांत ८३ गुण) गुणतालिकेत अग्रस्थान मिळवले असले, तरी दोन गुण गमावणे त्यांना महागात पडू शकेल. दुसऱ्या स्थानावर असलेल्या मँचेस्टर सिटीचेही ८३ गुण असून त्यांनी लिव्हरपूलपेक्षा एक सामना कमी खेळला आहे.

लिव्हरपूलचे घरचे मैदान ॲनफिल्डवर झालेल्या या सामन्याच्या पूर्वार्धात दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आले. उत्तरार्धात मात्र सॉन ह्युंग मिनने (५६वे मिनिट) गोल करीत टॉटनहॅमला अनपेक्षित आघाडी मिळवून दिली. यानंतर लिव्हरपूलने आक्रमणाचा वेग वाढवला. लुईस डियाझने ७४व्या मिनिटाला गोल झळकावत लिव्हरपूलला १-१ अशी बरोबरी साधून दिली. मग दोन्ही संघांनी आणखी एक गोल करीत सामना जिंकण्याचे



प्रयत्न सुरू केले, मात्र उभय गोलरक्षक आणि बचावपटूंच्या चांगल्या कामगिरीमुळे बरोबरीची कोंडी अखेपर्यंत कायम राहिली. या बरोबरीमुळे लिव्हरपूलची घरच्या मैदानावर सलग १२ सामने जिंकण्याची मालिका खंडित झाली आहे.

## दिनेश कार्तिकची फलंदाजी पाहून विराट कोहलीने केले नमन

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू संघाने सनरायझर्स हैदराबादवर ६७ धावांनी मात केली. या सामन्यात बंगळुरूने हैदराबादसमोर १९३ धावांचे आव्हान उभे केले. ही धावसंख्या उभारताना फिनिशर म्हणून ओळख असलेला दिनेश कार्तिक याने थक्क करून टाकणारी फलंदाजी केली. त्याने अवघ्या आठ चेंडूममध्ये ३० धावा केल्या. त्याच्या या फलंदाजीने विराट कोहलीदेखील प्रभावित झाला आहे.

३३ धावा करून ग्लेन मॅक्सवेल झेलबाद झाल्यानंतर दिनेश कार्तिक फलंदाजीसाठी आला. कार्तिक जेव्हा मैदानात उतरला तेव्हा अवघे आठ चेंडू शिल्लक होते. त्यामुळे त्याने आक्रमक पद्धतीने फलंदाजी केली. शेवटच्या षटकातील दोन चेंडूवर फॅफ डू प्लेसिसने तीन धावा केल्या. त्यानंतर स्ट्राईकवर आलेल्या कार्तिकने चार चेंडूमध्ये एकापाठोपाठ तीन षटकार आणि एक चौकार लगावला. त्याने अवघ्या चार चेंडूमध्ये २२ धावा केल्या, तर पूर्ण डावात त्याने चार षटकार आणि एक चौकार लगावत आठ चेंडूमध्ये ३० धावा केल्या. कार्तिकची ही खेळी पाहून कोहलीने कौतुक केले. ड्रेसिंग रुममध्ये कोहली हा कार्तिकसमोर थेट नतमस्तक झाला.

# उरणचे धावपटू प्रभाकर ठाकूर यांचे राष्ट्रीय स्पर्धेत सुयश

## क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल मदतीची अपेक्षा

**उरण : रामप्रहर वृत्त**



उरण तालुक्यातील नागाव येथे राहणारे ज्येष्ठ धावपटू प्रभाकर दामोदर ठाकूर यांनी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय घवघवीत यश मिळविले आहे. आगामी काळात ते बंगळुरू आणि केरळमध्ये होणाऱ्या स्पर्धेतही सहभागी होणार आहेत. क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्य सरकारने आर्थिक मदत करून पाठबळ द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

प्रभाकर ठाकूर हे सन १९८०पासून ते आजतागायत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या धावण्याच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेत आले आहेत. त्यांना आतापर्यंत २०० प्रमाणपत्र, ६० सन्मानचिन्हे, ६० पदके मिळाली आहेत. त्यांनी आतापर्यंत मलेशिया, न्यूझीलंड, थायलंड येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेत सुयश संपादन केले आहे. त्यांनी दिल्ली येथे २८ एप्रिल ते ५ मेदरम्यान झालेल्या धावण्याच्या स्पर्धेत ७५ वर्ष गटातील दहा, पाच आणि दीड किमी शर्यतीत प्रथम क्रमांक पटकाविला.

बंगळुरू येथे ११ ते १४ मेदरम्यान होणाऱ्या पॅन इंडिया मास्टर स्पर्धेत प्रभाकर ठाकूर भाग घेणार असून त्यानंतर १६ ते २२ मे या कालावधीत केरळमध्ये होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धांमध्येही यश संपादन करणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

क्रीडा क्षेत्रात भरीव योगदान दिले असतानाही प्रभाकर ठाकूर यांना राज्य सरकारकडून एका रुपयाचेही मानधन मिळाले नाही. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्रव्यवहार केला आहे तसेच त्यांनी रायगड भूषण पुरस्कार मिळण्यासाठीही अलिबाग येथे अर्ज दिला असून त्याचीही अद्याप दखल घेण्यात आली नाही.

या संदर्भात बोलताना प्रभाकर ठाकूर म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून मी धावण्याच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन यश संपादन केले. या कारकिर्दीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे मोलाचे सहकार्य लाभले, मात्र राज्य सरकारकडून कोणती मदत मिळालेली नाही. माझे वय लक्षात घेता ती मिळावी.




हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

“Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**